रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) II वर्ष ८५ II अंक २३२ II पृष्ठे ८

www.krushival.in

आदिवासी विद्यार्थ्यांना दिली मायेची ऊब



पान ३ वर

# कृषीवल

रायगड ॥ शनिवार, दिनांक २९ जानेवारी २०२२

किंमत ४ ₹

## रायगड जिल्ह्यात ४६६ रुग्ण

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।** रायगड जिल्ह्यात शुक्रवार २८ जानेवारी रोजी कोरोनाच्या ४६६ नव्या रुग्णांची नोंद झाली असून उपचारादरम्यान चार रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तर दिवसभरात १ हजार ३४७ रुग्ण कोरोनामुक्त झाले. सद्यस्थितीत जिल्ह्यात ७ हजार २८ सक्रीय रुग्ण उपचार घेत असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. शुक्रवारी पनवेल महापालिका हद्दीत २०९, पनवेल ग्रामीण ६३, उरण १०, खालापूर २३, कर्जत १२, पेण ५६, अलिबाग ४२, मुरुड ४, माणगाव १५, रोहा १७, सुधागड ३, श्रीवर्धन ५, म्हसळा २, तर महाड ५ असे ४६६ रुग्ण आढळले. तर तळा, पोलादपूर या दोन तालुक्यात एकही रुग्ण आढळला नाही.

# अखेर आमदारांचे निलंबन रद्द

*। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।*
*इतर मागासवर्गीयांचे (ओबीसी) राजकीय आरक्षण कायम राहण्याकरिता केंद्राकडून सांख्यिकी माहिती मिळावी, यासाठी पावसाळी अधिवेशनावेळी विधानसभेत मांडण्यात आलेल्या ठरावावेळी विरोधकांनी जोरदार गदारोळ केला होता. अध्यक्षांच्या दालनात पीठासीन अधिकारी भास्कर जाधव यांना शिवीगाळ आणि अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी भाजपच्या १२ आमदारांना एका वर्षासाठी निलंबित करण्यात आले होते. यानंतर याप्रकरणी सुप्रीम कोर्टात धाव घेण्यात आली होती. सुप्रीम कोर्टाने हा निर्णय असंवैधानिक असल्याचे सांगत भाजपच्या १२ आमदारांचे निलंबन सुप्रीम कोर्टाकडून रद्द करण्यात आले आहे.*

## महाविकास आघाडीला सुप्रीम झटका

विधानसभेत ठराव करत भाजपच्या १२ आमदारांचे एका वर्षासाठी निलंबन करण्यात आले होते. त्यावेळी भास्कर जाधव पीठासीन अधिकारी होते. त्यांच्या अंगावर धावून जात शिवीगाळ केल्याने हे निलंबन करण्यात आले होते. दरम्यान, यानंतर निलंबित आमदारांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर गेल्या बऱ्याच दिवसांपासून सुनावणी सुरु होती. दरम्यान, अखेर न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला आहे.



न्यायालयाने आमदारांना निलंबित करण्याचा ठराव असंवैधानिक असल्याचे म्हटले आहे. तसेच निलंबन करायचे होते तर ते फक्त एका अधिवेशनापुरते असायला हवे होते असे सांगितले. न्यायालयाच्या निर्णयामुळे भाजपाच्या आमदारांना दिलासा मिळाला आहे. गेल्या सुनावणीत हा निर्णय लोकशाहीला धोका देणारा आणि तर्कहीन असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते.

पान २ वर

### निलंबित आमदार

अतुल भातखळकर, राम सातपुते, आशिष शेलार, संजय कुटे, योगेश सागर, कीर्तीकुमार बागडिया, गिरीश महाजन, जयकुमार रावल, अभिमन्यू पवार, पराग अळवणी, नारायण कुचे, हरीश पिंपळे या आमदारांचा समावेश होता. या सर्व निलंबन रद्द करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.




# ‘रविशेठ पाटील गेला खड्ड्यात’

**आ. महेंद्र दळवी यांचा संताप**

**ठेकेदाराच्या इंजिनिअरला शिवसैनिकांची मारहाण**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**
खारबंदिस्तीच्या कामात दोन कोटींचा हप्ता मागण्याचा आरोप पेणचे आमदार रवींद्र पाटील यांनी अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांच्यावर केल्यानंतर महेंद्र दळवी यांनी संताप व्यक्त करीत ठेकेदाराच्या इंजिनिअरसमोर ‘रविशेठ पाटील गेला खड्ड्यात, आम्ही तुम्हाला समज देतो’, असे उद्गार काढीत ‘मी कोणाला भीत नाही, आम्हाला काम द्या, स्थानिक लोकांसोबत ॲडजेस्टमेंट केलात नाहीत तर लोक कामे कशी करुन देतील?’ असे आव्हान रवींद्र पाटील यांना दिले आहे. पुन्हा असा प्रकार घडला, तर काम बंद पाडू, अशी धमकीदेखील महेंद्र दळवी यांनी ठेकेदाराला दिली आहे.



खारबंदिस्तीच्या कामात महेंद्र दळवी कंत्राटदाराकडून दोन कोटी रुपयांची मागणी करत असल्याचा आरोप पेणचे आमदार रवींद्र पाटील यांनी केल्याचे वृत्त ‘कृषीवल’ने प्रसिद्ध करताच बिंग फुटल्याने संतप्त पेणच्या शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी ठेकेदाराचे अभियंता सुनील पाटील यांना पेण कार्यालयात दमदाटी आणि मारहाण

पान २ वर

## महत्त्वाचे

### राज्यात पुन्हा थंडी वाढणार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
राज्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून थंडीचा कडाका वाढला आहे. तसेच येत्या २४ तासांत तापमानात आणखी घसरण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हवेत गारवा निर्माण होऊन थंडीची लाट येण्याची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. पश्चिमी चक्रवातामुळे राज्यात गारठा वाढला आहे. विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील किमान तापमान १० अंश सेल्सिअस जाणार आहे. वातावरणात गारवा राहू शकतो, असेही सांगण्यात आले आहे.

### शिक्षक पात्रता परीक्षेत घोटाळा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२१ म्हणजेच टीईटीसाठी अपात्र ठरलेल्या ७ हजार ८०० परीक्षार्थींना पैसे घेऊन उत्तीर्ण करण्यात आल्याची माहिती समोर आली. पैसे घेऊन टीईटी परीक्षार्थींना पात्र ठरवण्यात आल्याचे सायबर पोलिसांच्या तपासामध्ये समोर आले. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने २०१९-२० मध्ये घेतलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेत अपात्र ठरलेल्या ७ हजार ८०० परीक्षार्थींना पैसे घेऊन उत्तीर्ण करण्यात आल्याच्या या खुलाशामुळे एकच खळबळ उडाली आहे.

### टेलिकॉम कंपन्यांना दणका

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
प्रत्येक कंपनीने किमान एक प्लॅन व्हाऊचर, एक स्पेशल टॅरिफ व्हाउचर आणि एक कॉम्बो व्हाऊचर ज्याची वैधता २८ दिवस नसून, संपूर्ण ३० दिवसांचे असावे. जर ग्राहकाला या प्लॅन्सचे पुन्हा रिचार्ज करायचे असेल, तर ते सध्याच्या प्लॅनच्या तारखेपासून ते करू शकतात, अशी तरतूद असावी. अनेक यूजर्सकडून अशी तक्रार आली होती. त्यामुळे TRAI ला ग्राहकांच्या या तक्रारीकडे लक्ष देणे गरजेचे वाटले. ज्यामुळे त्यांनी सर्व दूरसंचार कंपन्यांना आता आदेश दिला आहे.

### पीपीई किट घालून रुग्णाचे पलायन

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
कोरोनावरील उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या २१ वर्षीय तरुणाने पळ काढल्याने रुग्णालयात एकच धावपळ सुरु झाली. दरम्यान, पोलिसांनी या तरुणाला लोकमान्य टिळक टर्मिनस येथून अटक केली आहे. २१ वर्षीय तरुणाला उपचारासाठी सेंट जॉर्ज रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. यावेळी या तरुणाने कचऱ्यात पडलेला पीपीई किट घालत रुग्णालयातून पळ काढला होता. यानंतर एमआरए पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# निटको टाईल्सविरोधात कामगार आक्रमक

**दोन वर्षांनंतरही न्यायाच्या प्रतीक्षेत**

**मात्र निकालास होतोय विलंब**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**
अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथे शेतकऱ्याच्या जमिनी घेऊन निटको कंपनी १५ वर्षांपूर्वी उभी राहिली. कंपनीचे मालक विवेक तलवार यांनी २७ जानेवारी २०२० रोजी कोणतीही पूर्वसूचना न देता कंपनीला टाळे ठोकले आणि रातोरात ३०० कर्मचारी रस्त्यावर आले. कंपनीविरोधात निटको टाईल्स कामगार संघटना आणि पदाधिकारी, तसेच कामगारांना २७ जानेवारी रोजी दोन वर्षे पूर्ण झाली म्हणून निटको टाईल्स कंपनीसमोर एकत्र येऊन तीव्र निषेध व्यक्त केला. कामगारांना त्यांच्या सेवेचा योग्य मोबदला दिला नाही, तर कंपनीविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निटको टाईल्स कामगार संघटनेचे अध्यक्ष प्रतिक पाटील यांनी दिला आहे.



२७जानेवारी२०२०पासूननिटको व्यवस्थापनाने कारखान्यात टाळेबंदी जाहीर केली होती. कामगारांच्यावतीने औद्योगिक न्यायालय ठाणे येथे दोन केसेस दाखल असून, पुढील सुनावणी कोर्टात सुरू आहे. कंपनीच्या या टाळेबंदीविरोधात कामगार उपायुक्त यांच्याकडे तक्रार दाखल केली असून, सुनावणी सुरू आहे. मात्र, कंपनीच्या व्यवस्थापनाकडून योग्य प्रतिसाद मिळाला नाही. कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची तसेच ग्रॅच्युएटीची रक्कम सुरक्षित असून, कामगारांना त्यांची संपूर्ण कायदेशीर देणी तसेच केलेल्या सेवेचा मोबदला योग्य दराने मिळावा, याकरिता कामगार संघटना सनदशीर व कायदेशीर मार्गाने प्रयत्न करीत आहे.

पान २ वर

### काय आहेत मागण्या?

- कामगारांना त्यांच्या सेवेचा योग्य मोबदला मिळावा.
- शेजारील जॉन्सन टाइल्स कंपनीने अशाच परिस्थितीमध्ये कामावरून कमी केलेल्या कामगारांना व्हीआरएसकरिता ४५ दिवसांचा अधिक मोबदला दिलेला आहे. त्याच पार्श्वभूमीवर निटकोमधील कामगारांना न्याय मिळावा.
- कामगारांना त्यांची संपूर्ण कायदेशीर देणी तसेच केलेल्या सेवेचा मोबदला योग्य दराने मिळावा

# पदोन्नतीतील आरक्षणाच्या अटी कमी करण्यास नकार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
सरकारी नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना पदोन्नतीमध्ये आरक्षणाच्या अटी कमी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. शुक्रवारी याबाबतचा महत्त्वपूर्ण निकाल देण्यात आला.

निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, आकडेवारी शिवाय नोकऱ्यांच्या पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यापूर्वी, राज्य सरकारांना एससी, एसटीचे संख्या कमी असल्याचे आकडेवारीद्वारे सिद्ध करावे लागेल. हे ठराविक कालावधीत केंद्र सरकारकडून निश्चित केलं पाहिजे. यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, ते एससी आणि एसटींना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याचा निर्णय पुन्हा उघडणार नाहीत, कारण ते कसे लागू करायचे हे राज्यांनी ठरवायचे आहे. न्यायमूर्ती एल. नागेश्वर राव यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने ॲटर्नी जनरल केके वेणुगोपाल, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल बलबीर सिंग यांनी विविध राज्यांच्या बाजूने उपस्थित असलेल्या इतर वरिष्ठ वकिलांसह सर्व पक्षकारांची सुनावणी घेतली.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**नराधमाला २० वर्षे कारावास**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**
अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधमाला विशेष सत्र न्यायालयाने २० वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. विशेष व अति सत्र न्यायाधीश शईदा शेख यांनी २८ जानेवारी रोजी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.

याबाबतचे वृत्त असे की, आरोपी परेश संजय मते याने ११ मार्च २०२१ रोजी पीडितासोबत फेसबुकवर मैत्री करून सुरुवातीला तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर फोनवरून तिच्याशी संवाद साधत आरोपीने तिच्या अज्ञातपणाचा व एकटेपणाचा फायदा घेऊन तिला तिच्या मर्जीशिवाय तसेच तिच्या आईवडिलांच्या कायदेशीर रखवालीतून आपटा फाटा येथे पळवून नेले. तेथेच तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. यानंतर त्याने चार वेळा

पान २ वर

## नितेश राणे जिल्हा न्यायालयात शरण

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
सुप्रीम कोर्टाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर भाजप आमदार नितेश राणे जिल्हा न्यायालयात हजर झाले आहेत. संतोष परब यांच्यावर झालेल्या हल्लाप्रकरणी नितेश राणे यांचा अटकूपर्व जामीन अर्ज सुप्रीम कोर्टाने फेटाळला. यावेळी कोर्टाने राणे यांना जिल्हा न्यायालयात शरण जाण्यास तसंच नियमित जामिनासाठी अर्ज करावा असे निर्देश दिले होते.



# रायगड किल्लाबंदीमुळे व्यावसायिक संकटांत

**। महाड । प्रतिनिधी ।**
राज्यांमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने शासनाने पर्यटन स्थळांवर पर्यटकांना बंदी घातली आहे. काही दिवसांपूर्वी पर्यटन स्थळे गजबजू लागलेली असताना पुन्हा पर्यटनस्थळे शांत झाली. किल्ले रायगड हे एक महाराष्ट्रातील महत्त्वाचे ऐतिहासिक स्थळ असल्याने दर दिवशी हजारो पर्यटक या परिसरामध्ये दिसत होते; परंतु अचानक पर्यटनावर बंद घालण्यात आल्याने सर्व व्यवहार बंद करावे लागले आहेत, त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांवर आर्थिक संकट उभे राहिले आहे.



किल्ले रायगडच्या परिसरांमध्ये असलेल्या अनेक गावांचा उदर निर्वाह हा पर्यटकांवर अवलंबून असल्याने दर दिवशी येणाऱ्या हजारो पर्यटकांमुळे अनेक तरुणांना रोजगार उपलब्ध झाला होता. रायगडवाडी, हिरकणीवाडी, परडीवाडी, टकमकवाडी येथील छोटे व्यवसायकरणाऱ्यांनाचांगलाचफटका बसला आहे. या ठिकाणी व्यवसाय करणारे सरबत, ताक, दही यांची विक्री, त्याचबरोबर हॉटेल, लॉजिंग व्यवसाय केले जातात. परंतु, २०१९ मध्ये कोरोनाचा संसर्ग सुरु झाल्यानंतर स्थानिक व्यवसायावर संक्रांत आली. आत पुन्हा तीच परिस्थिती निर्माण झाल्याने व्यावसायिक अडचणीत आले आहेत.

रायगडच्या परिसरामध्ये कोरोनाचा संसर्ग जरी जाणवत नसला तरी शासनाने पर्यटनस्थळे बंद केली आहेत. यामुळे रायगडावर गेल्या दोन महिन्यांपासून पर्यटक येणे बंद झाले आहे. याशिवाय खासगी प्रवासी वाहातुकीवरदेखील विपरीत परिणाम झाला आहे, असे असले तरी काही शिवप्रेमी पर्यटक गडाच्या पायथ्याशी येऊन दर्शन

पान २ वर

# शेतकऱ्याचं ‘पांढरं सोनं’ धोक्यात

**॥ वातावरणबदलामुळे कांद्याच्या उत्पादनात घट**

**॥ उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**
अलिबाग तालुक्यात पांढऱ्या कांद्याचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. शेतकऱ्याचे ‘पांढरे सोने’ अशी सफेद कांद्याला उपमा दिली जाते. परंतु, निसर्गाची अवकृपा झाली आली, आणि हक्काचे उत्पन्न देणारे हे कांद्याचे पीक धोक्यात आले.

पान २ वर



### गादी पद्धतीची लागवड सोयीची

**गेल्या दोन वर्षांपासून सतत निसर्ग बदलत असल्याने अवेळी पावसाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे लावलेली कांदा लागवड नष्ट होत आहे. बदलत्या वातावरणात शेतकऱ्यांनी गादी पद्धतीची लागवड करणे सोयीचे ठरणार आहे. पाऊस पडला तरी वाफे फुकट जाणार नाही. त्यामुळे कांदा मोठा होऊन उत्पादन ही जास्त मिळण्याची शक्यता आहे, असे उज्ज्वला बानखेले यांनी सांगितले.**

**बाणेर आणि खेड येथे शेतकऱ्यांचे कांद्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, आठ दिवसांत त्याचा अहवाल प्राप्त होणार आहे. त्यानंतर उपाययोजना काय करायच्या हे ठरविले जाणार आहे. मात्र, शेतकऱ्यांनी नवी पद्धतही अवलंबणे, ही काळाची गरज आहे.**
**– उज्ज्वला बानखेले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

# कोकण रेल्वेला इलेक्ट्रिक इंजिन

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
कोकण रेल्वे मार्गावर इतिहास घडला आहे. पहिल्यांदाच इलेक्ट्रिक इंजिनावर गाडी सुस्साट निघाली. गुरुवारी कोकण रेल्वेवर दिवा ते रत्नागिरी धावणाऱ्या पॅसेंजरला इलेक्ट्रिक इंजिन जोडून चालवण्यात आले. त्यामुळे आता बोगद्यातील धुरातून प्रवाशांची सुटका होण्यास मदत झाली आहे.



रत्नागिरी ते रोहादरम्यान विद्युतीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. याची चाचणीही यशस्वी झाली होती. त्यानंतर मालगाडी विद्युत इंजिनावर धावत होत्या. आता प्रवासी गाडी विद्युत इंजिनावर सुरु करण्यात यश आले आहे. दिवा ते रत्नागिरी पॅसेंजर ही विद्युत इंजिनावर धावली. त्यामुळे प्रदूषणमुक्त पर्व कोकण रेल्वेवर सुरु झाले आहे.


कोकण रेल्वे सुरु झाल्यापासून कोळसा आणि डिझेलवर धावत होती. तसेच कोकण रेल्वे मार्गावर केवळ डिझेलवर चालणारे इंजिन जोडून एक्सप्रेस चालवल्या जात होत्या. त्यामुळे प्रदूषणात वाढ होत होती. काहीवेळा तांत्रिक अडचणी आणि मर्यादा यायच्या. आता यातून सुटका झाली आहे. प्रथमच इलेक्ट्रिक इंजिन जोडून गाडी धावत असल्याने या गाडीचे स्वागत करण्यासाठी रेल्वेप्रेमी उपस्थित होते. मात्र, कोणताही गाजावजा रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आला नाही. साधी गाडीही सजविण्यात आलेली नव्हती, त्यामुळे रेल्वे प्रवाशांतून तीव्र नाराजी दिसून आली. गुरुवारी पहिल्या इलेक्ट्रिक इंजिन पॅसेंजरला जोडून चालविण्यात आली.

# रितेश-जेनेलियाने लावले अलिबागकरांना ‘वेड’

**समुद्रकिनारी चित्रपटाची शूटिंग; चाहत्यांची तोबा गर्दी**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**
**मराठी चित्रपटाचे सुपरस्टार रितेश देशमुख दिग्दर्शित आणि अभिनित ‘वेड’ या मराठी चित्रपटाचे चित्रिकरण अलिबाग परिसरात सुरू करण्यात आले आहे. रितेश देशमुख स्वतः या चित्रपटाचे दिग्दर्शक असून, त्यांची पत्नी जेनोलिया देशमुख या त्यांच्या सोबत काम करीत आहेत.**

बॉलिवूड इंडस्ट्री मधुन नावारूपाला आलेले रितेश विलासराव देशमुख यांना आता दिग्दर्शक होण्याचे वेड लागले आहे. स्वतः पडद्यामागून वेड चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. या ‘वेड’ चित्रपटाचे चित्रिकरण गुरुवारपासून अलिबाग परिसरात सुरु करण्यात आले आहे. शहरातील काही भागात चित्रिकरण करण्यात आल्यानंतर अलिबाग समुद्रकिनाऱ्याजवळ याचे चित्रिकरण करण्यात आले. यावेळी अलिबागकरांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, कोणालाही मोबाईलमध्ये शूटींग अथवा छायाचित्र काढण्यास मज्जाव करण्यात येत असल्याने चाहत्यांचा हिरमोड झाला.



२० वर्ष अभिनय कारकीर्द गाजवल्यानंतर अभिनेता रितेश देशमुख एका आगळ्यावेगळ्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मुंबई फिल्म कंपनीने सहाव्या मराठी चित्रपटाची घोषणा केली. विशेष बाब म्हणजे, या चित्रपटाद्वारे अभिनेत्री जेनेलिया देशमुख या ‘मराठी’ चित्रपटात

पान २ वर

# जे.जे. पाटील यांची तांत्रिक संचालकपदी निवड

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**
महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा २०२२ या स्पर्धेसाठी जे.जे. पाटील यांची तांत्रिक संचालकपदी निवड करण्यात आली आहे. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कबड्डी क्षेत्रात अनेक मुले व मुलींनी आपल्या आयुष्याला कलाटणी दिली आहे. त्यांनी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक होतकरू व उदयोन्मुख खेळाडूंना योग्य दिशा व मार्गदर्शन करण्याचे काम केले. त्यातून राज्य व देश पातळीवरील अनेक खेळाडू निर्माण होऊन देशाचे नावलौकिकात भर घातली. अनेकांचे भवितव्य उज्ज्वल करण्याची किमय्या कबड्डीने घडवली. त्यावेळी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.चे अध्यक्ष अजित पवार, गजानन कीर्तीकर, ॲड. आस्वाद पाटील यांच्या प्रेरणेतून ही संधी मिळत गेली. कर्तव्यतत्परतेने व समर्थपणे पार पाडेन, तन-मन- धनाने योगदान देत माझ्यावर सोपवलेल्या या पदाला योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न करेन, असे पाटील म्हणाले.



## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२९ जानेवारी**

१) श्री. शशिकांत मोहीते
२९-०१-१९४०
अलिबाग

२) श्रीम. आरती साष्ट
२९-०१-१९५४
ब्राह्मणआळी, अलिबाग

## म ह त्वा चे

### मतदार दिन साजरा

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

गोखले एज्यु. सोसायटीच्या श्रीवर्धन येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मतदार दिन साधेपणाने व कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पंचसूत्रीचा अवलंब करुन साजरा करण्यात आला. शासनाच्या निर्देशांनुसार नुकत्याच झालेल्या नवीन व पात्र विद्यार्थ्यांची नवीन मतदार म्हणून नोंदणी करण्यात आली. मतदार दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी जनजागरण व मतदानाचे महत्त्व समजण्यासाठी निबंध स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धा घेण्यात आली.

### उरण तहसीलवर दंडात्मक कारवाई

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यातील दिघोडे गावातील शेतकरी जयदेव ठाकूर यांनी माहिती अधिकारात उरण तहसील कार्यालयाकडे दिघोडे येथील शेतजमिनीमधील अवैध मातीचा भराव करून अनधिकृत कंटेनर यार्ड उभारून शेतकऱ्यांची व शासनाची केलेल्या फसवणुकीबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागितली असता न मिळाल्याने जयदेव ठाकूर यांनी राज्य माहिती अधिकारी कोकण खडपीठ यांच्याकडे दुसरे अपील केले. या अपिलात कोकण खंडपीठाने आदेश देऊनसुद्धा माहिती देण्यास कसूर केल्याने पाच हजारांचा दंड आकारण्यात आला आहे.

# रिलायन्सविरोधात शेतकरी आक्रमक

## बाधित शेतकऱ्यांना जलद नुकसान भरपाईची मागणी

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**



रिलायन्स नागोठणे कंपनीची रसायनमिश्रित टाकाऊ सांडपाण्याची पाईपलाइन फुटून शिहू चोळे विभागातील शेतकऱ्यांचे सातत्याने नुकसान होत असल्याचा आरोप शेतकरी संघर्ष समिती व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रिलायन्स कंपनीने विनाविलंब व जलद नुकसानभरपाई द्यावी अन्यथा आम्ही कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करू, असा इशारा सदर निवेदनाद्वारे देण्यात आला.

वेळोवेळी तक्रारी अर्ज व नुकसान भरपाईची मागणी करूनदेखील नुकसानभरपाई मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी शुक्रवारी दि.(२८) रोजी इस्टेट ऑफिसवर धडक देत रिलायन्स व्यवस्थापनाला आपल्या मागणीचे निवेदन दिले. यावेळी अनंत भुरे, रमेश घासे, नारायण म्हात्रे, धर्मा घासे, नामदेव घासे, भारती घासे, सुवर्णा घासे, नामदेव म्हात्रे, सखाराम गदमळे, धर्मा घासे, दिलीप घासे, सागर पाटील, लहू भुरे, कौसल्या पाटील, पूनम बैकर, हिराबाई भुरे, तृप्ती भोईर, झाकिबाई कुथे, सरस भोइर,पप्पी घासे आदी नुकसान बाधित शेतकरी उपस्थित होते.

### शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने आंदोलनाचा इशारा

यावेळी शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अनंत भुरे यांनी सुपीक जमिनीला रसायनमिश्रित सांडपाणी नापीक करीत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाल्याचे सांगितले. रिलायन्स कंपनीने शेतकऱ्यांच्या रोजीरोटीचा विचार करून योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अन्यथा आम्ही सर्व शेतकरी न्याय मिळेपर्यंत ठिय्या आंदोलन करू असा इशारा अनंत भुरे यांनी दिला. दरम्यान, शेतकऱ्यांच्या आक्रमक पवित्र्यानंतर रिलायन्स व्यवस्थापन नेमकी काय भूमिका घेणार? याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## मागासवर्गीय निधीचा गैरवापर

# रिपाईंचे उपोषण सुरूच

**। खेड । प्रतिनिधी ।**



(छायाचित्र : अजित जाधव)

तालुक्यातील भरणे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील बौद्धवाडीच्या नावाने मागासवर्गीय निधी आणून त्याचा गैरवापर केल्याच्या निषेधार्थ बुधवार, २६ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तर्फे खेड तहसील कार्यालयासमोर सुरू करण्यात आले सुरू करण्यात आलेले उपोषण दि. २८ रोजी सायंकाळी उशिरापर्यंत सुरूच होते.

खेड तालुक्यातील भरणे व भडगाव या दोन गावांच्या सीमेवरच एक पुल बांधण्यात आला आहे. या पुलाच्या कामासाठी विशेष घटक योजनेतून मागासवर्गीय निधीचा वापर भरणे बौद्धवाडी च्या नावाने करण्यात आला आहे. या पुलाचा मागासवर्गीयांसाठी कोणताही उपयोग नसून, मागासवर्गीयांच्या निधीचा गैरवापर असल्याचा आरोप रिपब्लिकन पार्टीतर्फे करण्यात आला आहे. हा निधी मिळवण्यासाठी खेडचे माजी नगराध्यक्ष वैभव खेडेकर यांनी मागणी केली होती. मागासवर्गीय वस्ती साठी शासनाकडून देण्यात येणारा निधी स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग करून घेणाऱ्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करत पूर्वी दिलेल्या इशार्याप्रमाणे रिपाई तर्फे प्रजासत्ताक दिनी उपोषण सुरू करण्यात आले.

तहसीलदार कार्यालयासमोर रिपब्लिकन पार्टीचे प्रदेश सदस्य दादा मर्चंडे, कोकण संपर्कप्रमुख सुशांत सकपाळ, शंकर तांबे, दिपेंद्र जाधव, मिलिंद तांबे, गणेश शिर्के, सुरेंद्र तांबे, जितेंद्र तांबे, आर.पी. येलवे, सुरेंद्र तथा दादा बोरजकर, विशाल तांबे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व भरणे बौद्धवाडीतील ग्रामस्थ या उपोषणात सहभागी झालेले आहेत.

# महाड येथे रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**। महाड । प्रतिनिधी ।**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून संकल्प सेवा ग्रुप महाड व एन्जॉय मित्र मंडळ महाड यांच्या संयुक्त विद्यमाने जनकल्याण रक्तपेढी महाड येथे यशस्वी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम भारतमातेला वंदन करून व स्व. मोहन जंगम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच माध्यमिक शिक्षक तथा पत्रकार स्वर्गीय शिंगटे सर यांना श्रद्धांजली अर्पण करून संजय मेहता, मोहन शेठ, गणेश जंगम, विजय लाड आदी मान्यवरांच्या हस्ते रक्तदान शिबिराचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे या भावनेने संकल्प सेवा ग्रुप आणि एन्जॉय मित्र मंडळ यांच्या आयोजनाने एकूण ५० जणांनी रक्तदानाचे कर्तव्य बजावले. या कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा संघर्ष पत्रकार असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष संतोष घरटकर, चिंतामणी ट्रेडर्सचे मालक राजीव वनारसे तसेच रत्नदीप ज्वेलर्सचे मालक उपस्थित होते. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी एन्जॉय मित्र मंडळाचे कैलास जंगम, संकल्प सेवा ग्रुप महाडचे प्रल्हाद ठाकूर, अविनाश खरे, संजय आव्हाड, संजय शेठ, शैलेश काकडे, राजूदास पवार, कुंदन विन्हेरकर, दयानंद जैतू तसेच संकल्प सेवा ग्रुपचे सर्व सदस्य यांनी मेहनत घेतली.

## पत्रकार रत्नाकर पाटील यांना पितृशोक

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील यांचे पिताश्री बाळाराम अंबू पाटील यांचे दि.२८ जानेवारी रोजी सकाळी निधन झाले. ते



निवृत्त प्राथमिक शिक्षक होते. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात चार विवाहित मुले, दोन विवाहित मुली, जावई, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी रविवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी पेण तालुक्यातील रावे गावात पातळगंगेच्या तीरी होणार आहे, तसेच तेरावा विधी कार्य बुधवार, दि. ९ फेब्रुवारी होणार आहे.

# जेएसएम महाविद्यालयात मराठी भाषासंवर्धन पंधरवडा साजरा

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**



मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन करण्यासाठी प्रतिवर्षी दि. १४ ते २८ जानेवारी हा कालावधी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने जे.एस.एम. महाविद्यालयात प्रा. डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. नीळकंठ शेरे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये 'मराठी भाषा संवर्धन : उपाययोजना' या विषयावरील निबंधलेखन, 'मराठी भाषा महत्त्व व संवर्धन' या विषयावरील घोषवाक्य लेखन, मराठी भाषा, म्हणी-वाक्प्रचार व साहित्य यावरील प्रश्नांवर आधारित प्रश्नमंजुषा, 'लॉकडाऊन' या विषयावरील कथालेखन, 'स्वातंत्र्याची ७५ वर्षे' या विषयांवरील स्वरचित काव्यलेखन अशा विविध स्पर्धांचे व काव्यवाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. काव्यवाचन उपक्रमात मराठी भाषेवरील कवितांचे वाचन करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय अशा दोन गटांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सर्व स्पर्धांमध्ये मिळून एकूण २३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

### मराठीच्या संवर्धनाचा निर्धार

**'मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या'च्या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांनी दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करून मराठीचे व तिच्या विविध बोलींचे संवर्धन करण्याचा निर्धार केला आहे. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून अलिबाग तालुक्यातील आक्षी येथील मराठीतील पहिल्या शिलालेखाचे जतन व संवर्धन करण्यासाठी विशेष मोहीम महाविद्यालयातर्फे हाती घेतली जाणार आहे. मराठी विभागातील प्रा. जयेश म्हात्रे, प्रा. सुरभी वाणी, विद्यार्थिनी प्रांजली जाधव यांनी या विविध उपक्रमांचे व सर्व स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले.**

# आदिवासींना मिळणार हक्काचा रस्ता

## माडभूवन, कोरलवाडीच्या रस्त्याचा नारळ फुटला

**। रसायनी । वार्ताहर ।**

स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर वर्षांनंतरही मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या आपटा ग्रामपंचायत हद्दीतील माडभूवन आणि कोरलवाडी आदिवासी वाड्यांच्या हक्काच्या रस्त्याचे भूमीपूजन पार पडले. रस्त्याचा नारळ फुटल्याने आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य दिसून आले.


यावेळी माडभुवन येथील भूमीपूजन जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, तर कोरलवाडी येथील रस्त्याचे भूमीपूजन ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यातील माडभुवन रस्त्यासाठी रत्नाकर घरत यांचेही योगदान आहे. यावेळी आदिवासी बांधवांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्प देऊन आभार मानले. यावेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील भानुषाली, वनपरिक्षेत्र कल्हे परिमंडळाचे वनपाल जी.पी. चव्हाण, आपटा सरपंच निकिता भोईर, ग्रामविकास अधिकारी शेंडगे, उपसरपंच ऋषभ धुमाळ, पांडुरंग भोईर, विजय मुरकुटे, दशरथ गायकर, डॉ. आरिफ दाखवे आदी उपस्थित होते. चांगला रस्ता असावा, ही येथील बांधवांची अनेक वर्षांपासून मागणी होती. परंतु, त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. आता रस्त्याच्या कामाला सुरुवात होत असल्याने समाधान व्यक्त होत आहे.



# लाला लजपत राय यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण

**वर्षा मेहता**

**। अलिबाग ।**



२८ जानेवारी १८६५ रोजी जन्मलेल्या लाला लजपत राय यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोलाची भूमिका बजावली होती. लाला लजपत राय, बाळ गंगाधर टिळक आणि बिपिन चंद्र पाल या लाल-बाल-पाल त्रिकुटातील ते तिघांपैकी एक होते. जे समाजसुधारक आणि स्वातंत्र्यसैनिक होते, ज्यांनी भारताला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळवून दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी लाला लजपत राय यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आणि स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे धैर्य, संघर्ष आणि समर्पण देशवासियांच्या सदैव स्मरणात राहील, असे सांगितले.

SOCIAL MEDIA पडसाद

पंजाब केसरी लाला लजपत राय यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन. स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या धैर्याची, संघर्षाची आणि समर्पणाची कहाणी देशवासियांच्या सदैव स्मरणात राहील, असे पंतप्रधानांनी हिंदीत ट्विट केले. म्हणून स्वातंत्र्यसैनिक लाला लजपत राय यांना त्यांच्या जयंतीनिमित्त लोकांनी आदरांजली वाहिली. त्यामुळे सोशल मीडियावर लाला लजपत राय हा हॅशटॅग ट्रेंड झाला.

पान १ वरुन

## अखेर आमदारांचे निलंबन रद्द

खंडपीठाने महाराष्ट्र राज्याची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील आर्यमा सुंदरम यांना अधिवेशनाच्या कालावधीनंतरच्या निलंबनाच्या तर्कसंगतीबद्दल कठोर प्रश्न विचारले होते. सहा महिन्यांहून अधिक काळ मतदारसंघापासून वंचित राहिल्यामुळे तुमचा एक वर्षाचा निर्णय तर्कहीन आहे. आता आपण संसदीय कायद्याच्या भावनेबद्दल बोलत आहोत.

न्यायमूर्ती सीटी रविकुमार म्हणाले होते की, निवडणूक आयोगाला आणखी एक गोष्ट आढळली. ती अशी की, ज्या मतदारसंघात जागा रिक्त असेल तिथे निवडणूक होईल. पण, निलंबन झाल्यास निवडणूकदेखील होणार नाही; परंतु एखाद्या व्यक्तीची हकालपट्टी झाल्यास निवडणूक घेतली जाईल. हा लोकशाहीला धोका आहे. एकाचवेळी १५/२० लोक निलंबित झाले तर लोकशाहीचे भवितव्य काय असेल?

## 'रविशेठ पाटील गेला खड्ड्यात'

करीत गाडीत घालून महेंद्र दळवी यांच्यासमोर हजर केले. त्यांच्यावर प्रश्नांचा भडिमार करीत रवींद्र पाटील खंडणीबाबत बोलत असताना तुम्ही त्यांना का अडविले नाही, असा जाब विचारला. महेंद्र दळवी यांच्यासमोर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी 'आम्ही याला ठोकून बांधावर आडवा टाकणार होतो' असेही विधान केले. मुळात, हा आरोप पाटील यांनी केला असता, त्यांना जाब विचारण्याऐवजी ठेकेदाराला वेठीस धरण्याचा प्रकार पाहून संताप व्यक्त केला जात आहे. घाबरवून दहशतवाद पसरविण्याच्या या प्रकारामुळे अलिबाग, पेणमध्ये दहशतवाद निर्माण करण्याचा प्रकार असल्याचे बोलले जात आहे. या प्रकारामुळे ठेकेदार आणि त्याचे इंजिनिअर घाबरुन गेले आहेत. त्यांच्या जीवाचे काही बरे-वाईट झाले तर त्याला जबाबदार कोण, असा सवाल केला जात आहे.

## निटको टाईल्सविरोधात कामगार आक्रमक

कंपनी व्यवस्थापनाची नकारात्मक भूमिका असल्यामुळे गेल्या दोन वर्षात सदर प्रश्न सुटू शकला नाही. कामगार संघटनेने आंदोलन करण्याचे ठरविले असून लवकरच आंदोलनाची धार प्रखर केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

कंपनी बंद होऊन दोन वर्षे झाली असल्याने कर्मचाऱ्यांची आर्थिक गणिते चुकली आहेत. मुलांच्या शिक्षणाचा, कुटुंबाचा खर्च चालविणे कठीण झाले आहे. कोरोना १९ च्या महामारीमुळे न्यायालयीन कामकाज तसेच कामगार उपआयुक्त यांचेकडील सुनावणी यामध्ये थोडीफार दिरंगाई झाली. याचाच पुरेपूर गैरफायदा कंपनी मालकांनी घेतला असून, कामगारांमध्ये कंपनी मालकाबद्दल असंतोष निर्माण झाला आहे.

## रायगड किल्लाबंदीमुळे व्यावसायिक संकटात

घेण्याचा प्रयत्न करीत असतात परंतु सुरक्षा रक्षकांमध्ये त्यांना गडावर जाण्यास मनाई करण्यात येत आहे. त्यामुळे निराश होऊन राज्यांतून आलेल्या शिवभक्तांना दर्शन घेता परत जावे लागत आहे.

पाचाड, हिरकणीवाडी, रायगडवाडी येथील स्थानिक ग्रामस्थांची रोजीरोटी पर्यटकांवर अवलंबून असल्याने शासनाने अशा छोट्या व्यावसायिकांना मदत करावी, अशी मागणी जनसंवाद संस्थेचे अध्यक्ष निलेश पवार यांनी केली आहे.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन पीडितेवर लैंगिक अत्याचार केले. या प्रकरणात मुलीचे वय १२ वर्षांचे आहे, हे माहीत असूनसुध्दा तिला आरोपीने पळवून नेले होते. आरोपीवरील आरोप न्यायालयासमोर सिध्द झाले आहे. त्यानुसार न्यायालयाने आरोपी परेश मते यास दोषी ठरवून २० वर्षांची शिक्षा व रक्कम रुपये ५० हजार रकमेचा दंड ठोठावला आहे. या प्रकरणातील फिर्यादी पीडितेच्या वडिलांनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक मीनल शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जलदगतीने तपास पूर्ण केल्याने आरोपीला शिक्षा होऊ शकली.

## शेतकऱ्याचं 'पांढरं सोनं' धोक्यात

सातत्याने बदलणाऱ्या वातावरणाचा कांदा पिकाला फटका बसत असल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

अवेळी पडत असलेला पाऊस, धुके या वातावरण बदलाचा फटका अलिबाग तालुक्यातील प्रसिद्ध आणि गुणकारी पांढऱ्या कांद्यावर परिणाम झाला आहे. कांद्याची मुळं ही ओल्या जमिनीमुळे कुजू लागल्याने शेतकऱ्यांनी बनविलेले वाफे मरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लहरी हवामानामुळे यंदा पांढऱ्या कांद्याचे उत्पादन घटण्याची भीती निर्माण झाली आहे. गेली दोन वर्षे सतत बदलत असलेल्या वातावरणामुळे पांढऱ्या कांद्याची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी गादी पद्धतीने त्याची लागवड करावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

अलिबागचा पांढरा कांदा हा सुप्रसिद्ध आहे. हा कांदा औषधी आणि गुणकारी आहे. त्यामुळे बाजारात अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला प्रचंड मागणी आहे. पांढऱ्या कांद्याला जीआय मानांकन ही मिळालेले असून यावर्षी उत्पादन वाढविण्याचा मानस कृषी विभागाचा होता. मात्र निसर्गापुढे हा मानस पूर्ण होणे कठीण झाले आहे. भात कापणी झाल्यानंतर जमीन सुकली की शेतकरी पांढऱ्या कांद्याची लागवड करतो. तालुक्यातील नेहुली, वाडगाव, सागाव, तळवली, कार्ले, खंडाळे या भागात पांढऱ्या कांद्याचे उत्पादन घेतले जाते. साधारण अडीच हजार हेक्टरवर पांढरा कांदा लागवड केली जाते. बदलत्या वातावरणाचा पांढरा कांदा लागवडीला फटका बसला असून, रोगाचा धोका निर्माण झाला आहे.

## रितेश-जेनेलियाने लावले अलिबागकरांना 'वेड'

पदार्पण करत आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन रितेश देशमुख करत आहेत. तर म्युझिक 'अजय-अतुल' यांचे असणार आहे. यापूर्वी जिनिलियाने हिंदी, तेलगू, तामिळ, कन्नड आणि मल्याळम अशा तब्बल पाच भाषिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. तसेच अभिनेत्री जिया शंकर या चित्रपटात भूमिका साकारत आहेत. १२ ऑगस्ट २०२२ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे हा चित्रपट नक्कीच सुपरहिट राहील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

Bandhan Bank

रीजनल कार्यालय: नेताजी मार्ग, मिठाकली सिक्स रस्त्यांजवळ, एलिसब्रिज, अहमदाबाद-6.
फॅक्स: +91-79-26560649 | टोल फ्री क्र.: 18002335300
वेबसाइट: www.bandhanbank.com

**विक्री नोटीस-निविदा मागविण्यासंबंधी**

त्यामुळे विक्री सूचनेसह आमंत्रण याद्वारे सर्वसाधारणपणे सार्वजनिकरित्या आणि खासकरुन कर्जदाराना देण्यात येत आहे की पूर्वी गृहकडे **(आता ''दि बंधन बँक'')** तारण ठेवलेली खाली नमूद केलेली स्थावर मालमत्ता विक्रीसाठी ठेवली आहे. मालमत्ता विक्रीसाठी आवश्यक तपशील वेळापत्रकात दिले आहेत:

| कर्जदाराचे (कर्जदारांचे), कर्ज खाते क्र., ताब्याची तारीख, निविदा संदर्भ क्र. | विक्री करावयाच्या मालमत्तेचे वर्णन (प्रतिभूत मालमत्ता) | मागणी नोटिशीच्या तारखेला आणि 17.01.2022 रोजी प्रतिभूत ऋण (रुपयांमध्ये) इतकी रक्कम, ज्यामध्ये मागणी नोटिशीच्या तारखेपासून कर्जदाराने भरलेली कोणतीही रक्कम समाविष्ट, जर असल्यास, पुढील व्याज, खर्च, प्रभार इत्यादींसह | आरक्षित किंमत आणि प्रदेय ईएमडी (रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|
| श्री. महेश बाबुराव केणी<br>श्रीमती. अर्चना महेश केणी<br>422/127<br>17.02.2021<br>422-1095 | 14/4बी, अंतिम प्लॉट क्र. 2, 305 पांडुरंग रेसिडेन्सी, रीस, खालापूर, रायगड, महाराष्ट्र - 410202 येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व भाग व भूभाग आहेत. | 23.11.2017 रोजीपर्यंत रु.11,96,270.84<br>17.01.2022 रोजीपर्यंत रु. 20,35,455.33 | रु.18,60,000/-<br>ऑफर किमतीच्या 10% ईएमडी |

**उपरोक्त मालमत्तेकरिता निविदा खुली करण्याची तारीख आणि इतर तपशील खाली देण्यात आलेला आहे.**

| | |
|---|---|
| निविदा प्रपत्र शुल्क | रु.100/- प्रति निविदा, बँकर्सच्या चेक/डिमांड ड्राफ्टद्वारे ''बंधन बँक लिमिटेड (नॉन रिफंडेबल/परत न करण्यायोग्य) च्या नावाने देय |
| मालमत्तेच्या निरीक्षणाची तारीख | 21.02.2022 रोजी सकाळी 10:00 ते संध्याकाळी 5:00 वाजेपर्यंत |
| निविदा प्राप्त करण्याची अंतिम तारीख आणि वेळ | 08.03.2022 रोजी संध्या 5.00 वाजेपर्यंत बंधन बँक लिमिटेडचे क्षेत्रीय कार्यालय, नेताजी मार्ग, मिठाखली सिक्स रोड्स जवळ, एलिसब्रिज अहमदाबाद-380 006 येथे |
| प्रदेय बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) | ऑफर किंमतीचे 10% निविदासह बँकर्सच्या चेक/डिमांड ड्राफ्टद्वारे ''बंधन बँक लिमिटेड'' च्या नावाने देणे आवश्यक आहे |
| निविदा उघडण्याची तारीख, वेळ आणि ठिकाण | वर नमूद केल्याप्रमाणे निविदा 11.03.2022 रोजी बंधन बँकच्या क्षेत्रीय कार्यालयात सुरु होईल (उघडण्यात येईल) |
| निविदा अर्ज येथे उपलब्ध | **बंधन बँक लिमिटेड., खोपोली शाखा,** दुकान क्र. 5 आणि 6, योगेश्वर बिल्डिंग, युनियन बँक ऑफ इंडिया जवळ, एलबीएस नगर, मुंबई-पुणे हायवे, खोपोली-410203, जि. रायगड, महाराष्ट्र<br>**संपर्क व्यक्तींचे नाव:**<br>श्री. भुषण पावसकर: 7558350858 / 7044420072, श्री. सुरज अवघडे: 9702298454 |

विक्रीची मालमत्ता ही **'जे आहे जेथे आहे तत्त्वावर', 'जे आहे जसे आहे तत्त्वावर', 'नो रिकोर्स बेसिस तत्त्वावर'** आणि **'तेथे जे काही आहे तत्त्वावर'** असेल. आरक्षित किमतीच्या खाली मालमत्तेची विक्री करण्यात येणार नाही. बँकसादर करते की आम्हाला बंधनच्या नावे पुर्वोक्त मालमत्तेच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या किंवा प्रलंबित असलेल्या वाद, विवाद यांविषयी कोणतीही सूचना प्राप्त झालेली नाही. कर्जदार/मॉर्टगेजर हे SARFAESI अधिनियमाच्या कलम 13(8) अंतर्गत विक्री पुष्टीच्या तारखेपर्यंत गहाण विमोचन करू शकतील. विक्री नोटीस सह निविदेसाठी आमंत्रणाच्या अटी व शर्तींच्या तपशीलाकरिता, कृपया आमच्या www.gruh.com\tender चा संदर्भ घ्या.

**दिनांक: 29/01/2022**
**स्थळ: रायगड**

**बंधन बँक लिमिटेड**
**प्राधिकृत अधिकारी**

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022)


## वृक्षसंवर्धनासाठी ना निधी, ना कर्मचारी

# महाड सामाजिक वनीकरण विभागाचे कामकाज ठप्प

**। महाड । प्रतिनिधी ।**

**राज्य शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडून महाड तालुक्यामध्ये वृक्षलागवड झालेली आहे; परंतु या वृक्षांच्या संवर्धनाकरिता या विभागाकडे निधीची कमतरता आहे, त्याचबरोबर येथील कार्यालयांमध्ये कर्मचारीदेखील नसल्याने कामावर परिणाम झाला आहे.पावसाळ्यामध्ये लागवड करण्यात आलेली रोपे वणव्यामध्ये नष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

महाड तालुक्यामध्ये सामाजिक वनीकरण विभागाकडून मोठ्या प्रमाणामध्ये वृक्षलागवड करण्यात आली असून, ग्रामीण भागांमध्ये रस्त्याच्या बाजूला, पडीक जागेत, डोंगराच्या उतारावर छोटी रोपे लावण्यात आली आहेत. यांतील लहान रोपे पावसाच्या पाण्यावर चांगल्या स्वरुपामध्ये राहिली आहेत. परंतु, लावण्यात आलेल्या रोपांची निगराणी करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, अशी माहिती येथील सामाजिक वनीकरण विभाग कार्यालयाकडून देण्यात आली.

फेब्रुवारीनंतर उन्हाळ्याला सुरुवात होणार आहे. त्याचबरोबर वणव्याचा धोकादेखील निर्माण होण्याची शक्यता आहे. वणव्यामुळे शेकडो रोपे नष्ट होतात. प्रचंड मेहनत आणि खर्च करुन लावण्यात आलेली रोपे फुकट जाणार असल्याने शासनाने निधी उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

सामाजिक वनीकरण, वन विभाग, अन्य सामाजिक संस्थांकडून प्रतिवर्षी वृक्षांची लागवड करण्यात येते. याकरिता सामाजिक आणि वन विभागाच्या नर्सरीमधून रोपे दिली जातात. यावर खर्चदेखील प्रचंड करण्यात येतो. पावसाळ्या प्रारंभी वृक्ष रोपांचे वितरण करण्यात आल्यानंतर



त्याची लागवड वन आणि सामाजिक वनीकरण विभागाकडून केली जाते. पावसाळ्यामध्ये रोपांकडे लक्ष दिले जात नाही; परंतु पावसाळ्यानंतर रोपांचे संवर्धन करण्याची आवश्यकता आहे. परंतु, निधी उपलब्ध नसल्याने रोपांकडे दुर्लक्ष होते. त्याचबरोबर वनप्राणी व पाळीव प्राण्यांचादेखील धोका असल्याने रोपांवर लक्ष ठेवणे तेवढेच आवश्यक आहे.

महाडतालुक्यामध्येउन्हाळ्याच्या दिवसामध्ये अनेक परिसरांत पारंपरिक पद्धतीने वणवे लावले जातात, यामुळे अथक प्रयत्नातून लावण्यात आलेली रोपे आगीमध्ये जळून भस्म होतात. अशा रोपांच्या लागवडीवर लाखो रुपये खर्च केले जातात, तरीही आगी लावण्याच्या घटना घडत आहेत.

> वृक्षांची लागवड करणे सोपे आहे, मात्र या वृक्षांचे संवर्धन करणे जरी अवघड असले तरी आज काळाची गरज झाली आहे. राजकीय नेते, औद्योगिक कंपन्या, ग्रामस्थांनी पुढे येऊन संवर्धनाचे नियोजन करणे आवश्यक आहे.
>
> – अविनाश चव्हाण

### दोन वर्षांत करोडोंचा खर्च

महाड तालुक्यामध्ये वनीकरण विभागाने सन २०१८ ते २020 पर्यंत केलेल्या लागवडीची माहिती दिली असून, महाड तालुक्यातील चांभारखिंड, मुठवली, वामने, शिरगाव, दादली, गोंडाळे या गावांमध्ये गट लागवड केली आहे. याकरिता १३ लाख ९८ हजार ७४५ रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन २०१८-१९ मध्ये ५ लाख ७५ हजार रोपांची निमिती करण्यात आली, याकरिता ६ लाख ३२ हजार ९७ रुपये खर्च करण्यात आला. २०१८ पासून तालुक्यामध्ये रस्त्याच्या दुतर्फा लागवड करण्यात आली असून, त्याकरिता ३० लाख २३ हजार ७६८ रुपये खर्च करण्यात आला. दोन वर्षामध्ये एका तालुक्यांमध्ये करोडो रुपये खर्च करण्यात आले असले तरी संवर्धन करण्यासाठी निधी नाही, तसेच कर्मचारीदेखील नाहीत. महाड शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या शिरगाव चांभारखिंड येथे सतत आगी लागत असल्याने या परिसरामध्ये वृक्षाची लागवड झाली आहे का, असा प्रश्न उभा राहातो.

## महत्वाचे

### मोबाईलचोर अटकेत

**। पनवेल । वार्ताहर ।**

प्रवाशाचा मोबाईल फोन जबरीने खेचून पळून जाणाऱ्या मोहम्मद अश्फाक जाफर अली अन्सारी नावाच्या गोवंडी येथे राहणाऱ्या आरोपीस वाशी रेल्वे पोलिसांनी पाठलाग करून रंगेहाथ पकडले आहे. पनवेल तालुक्यातील उसर्लीगाव येथे राहणारा नवनाथ पोस्तूरे हा तरुण कुर्ला ते पनवेल असा लोकलने प्रवास करत होता. मोहम्मद अन्सारी याने नवनाथ पोस्तुरे यांच्या हातातील मोबाईल फोन जबरदस्तीने खेचून तो पळून जाऊ लागला. त्यावेळी स्थानकात ड्युटीवर असलेले पोलीस अंमलदार काकडे यांनी त्यास प्रवाशांच्या मदतीने पाठलाग करून पकडले.

### बालमजुरांची सुटका

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पथकाने खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन आस्थापनांवर छापा टाकून तीन बालकामगारांना कामाच्या जोखडातून मुक्त केले. याप्रकरणी चार मालकांवर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी श्री देवदर्शन डेअरीचे मालक शांतीलाल गुजर (३४) व दिलीप छगनलालजी गुजर या दोघांविरोधात तसेच चाँमुण्डा ओल्ड पेपर मार्ट, शॉप आस्थापनेचे मालक वालाराम पटेल, (३८) व भगवतीलाल पटेल विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नवजात अर्भकाच्या पालकांचा शोध सुरु

**। पनवेल । वार्ताहर ।**

एकदिवसीय नवजात स्त्री जातीच्या अर्भकाच्या पालकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. तालुक्यातील नांदगाव येथील एकविरा मंदिराच्या शेजारी चाळीच्या पाठीमागील बाजूस या अर्भकास कोणीतरी सोडून दिले आहे. त्यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत कोणालाही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्रमांक २७४५२३३३ किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत शेडगे यांच्याशी संपर्क साधावा.

## उपोषणानंतर डिस्कव्हर व्यवस्थापन नरमले

### निलंबित कर्मचाऱ्यांना घेतले कामावर



**। नेरळ । वार्ताहर ।**

तालुक्यतील नेरळजवळील धामोते येथील डिस्कव्हर रिसॉर्टच्या व्यवस्थापकाने कामगारांना १२ जानेवारी रोजी अचानक कामावरून कमी केले होते. न्याय्य हक्कासाठी या कामगारांनी डिस्कव्हर रिसॉर्टच्या व्यवस्थापकाच्या विरोधात २६ जानेवारीपासून रिसॉर्टच्या समोर उपोषण सुरू होते. उपोषणच्या तिसऱ्या दिवशी उपोषणाला बसलेल्या सर्व पाच कामगारांना पुन्हा कामावर घेतले आहे.

धामोते येथील डिस्कव्हर रिसॉर्ट येथे काम करणाऱ्या काही कामगारांना रिसॉर्ट व्यवस्थापकाने कोणत्याही प्रकारे पूर्वसूचना न देता अचानक कामावरून काढले होते.

## निरुपणाच्या माध्यमातून प्रेरणादायी काम

### खा. सुनील तटकरे यांचे गौरवोद्गार

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

२०व्या शतकात महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी निरुपणाच्या बैठकीतून महाराष्ट्राला आध्यात्मिक विचार देऊन लोकांसाठी प्रेरणादायी काम केलेय, असे गौरवोद्गार खा. सुनील तटकरे यांनी काढले. मुरूड पंचायत समितीच्या सभागृहास महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या नावाचे अनावरण व पंचायत समिती प्रांगणात बांधलेले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण आदर्श घरकुलच्या डेमो प्रदर्शन हाऊसचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मुरूड पंचायत समिती सभापती आशिका ठाकूर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष



मंगेश दांडेकर, शिवसेना मुरूड तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरिकर, अनंता ठाकूर, उपसभापती चंद्रकांत मोहिते, प्रणिता पाटील, सदानंद मुंबईकर, तहसीलदार रोहन शिंदे, आदी मान्यवर आणि दासभक्त, नागरिक उपस्थित होते.

खा. तटकरे पुढे म्हणाले, की बैठकीतून आध्यात्मिक विचार देऊन व्यसनाधीनतेकडे वळत असलेल्या अनेक व्यक्तींना आणि तरुणांना सन्मार्गाला लावून अनेक उद्ध्वस्त होणारे तळागाळातील अनेक संसार वाचविले. वृक्षारोपण, रक्तदान शिबीर आदी सामाजिक दायित्व वाढीस लावले. तीच परंपरा आप्पासाहेब समर्पित कार्याने पुढे चालवत याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

## गुंडगे येथील बंदिस्त गटार कामाचे भूमीपूजन

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत शहरातील गुंडगे या प्रभागातील नगरसेविका वैशाली मोरे यांनी आपल्या प्रभागातील विकासकामांचा केलेला पाठपुरावा यशस्वी ठरला आहे. प्रभागातील बंदिस्त गटारे या कामाचे भूमीपूजन आणि मुख्य रस्त्यावर स्ट्रीट लाईटचे लोकार्पण करण्यात आले.

कर्जत नगरपरिषदेच्या गुंडगे या प्रभाग आठमधील नगरसेविका वैशाली मोरे यांनी पालिकेकडे तेथील बंदिस्त गटारे आणि त्या भागातील मुख्य रस्त्यावर स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्याची मागणी केली होती. बंदिस्त गटारे, अंतर्गत रस्ता, गटार बनवणे कामाचे भूमीपूजन नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पाणीपुरवठा सभापती राहुल डाळिंबकर, नगरसेवक विवेक दांडेकर आदींसह स्थानिक नागरिक उपस्थित होते. तर भिसेगाव येथून गुंडगेकडे जाणाऱ्या मार्गावर स्ट्रीट लाईट आणि पथदिवे बसविण्यात आले असून, त्या उपक्रमाचे लोकरापन्न नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.



## हेमनगर शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

### तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाऊंडेशनचा पुढाकार

**। कुसुंबळे । वार्ताहर ।**

तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाऊंडेशन अलिबाग यांच्या माध्यमातून पनवेल महानगरपालिका नगरसेविका राजश्री वावेकर यांच्या सहकार्याने त्यांच्या हस्ते हेमनगर येथील राजिप प्राथमिक शाळा येथील पहिली ते चौथीपर्यंतच्या मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी कुसुंबळे उपसरपंच रसिका राजा केणी, सदस्या जागृती पाटील, तेजस्विनी सामाजिक फाऊंडेशनच्या अध्यक्षा जीविता पाटील, महेंद्र वावेकर, भाग्यश्री तांडेल, सुशांत तांडेल,



निलेश थळे, पत्रकार दीपक पाटील, अरुण पाटील, धीरज पाटील, दिलीप मोकल, डॉ. रेखा म्हात्रे, मीनाक्षी केणी, ॲड. विकास पाटील, ॲड. अमर घरत, विधी प्राधिकरण स्वयंसेवक रुपेश पाटील, लेखक देवेंद्र केळुस्कर, मुख्याध्यापिका स्वप्नाली पाटील, उपमुख्याध्यपिका सुप्रिया पाटील, बळीराम खरसंबळे, राखी पाटील, धन्यता निळकर, फोटोग्राफर अजित पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रथम जीविता पाटील यांचे गुरुजी बळीराम खरसंबळे यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. त्याप्रसंगी जिविता पाटील यांनी २९ वर्षांपूर्वीच्या त्यावेळीच्या शिक्षणाच्या पद्धतींच्या काही बाबी सांगून आठवणींना उजाळा दिला. यावेळी आपण समाजाचं काहीतरी देणे आहोत ही भावना मनात ठेवून तेजस्विनी फाऊंडेशन समाजात कार्य करेल, असे मत अध्यक्षा जीविता पाटील यांनी व्यक्त केले. नगरसेविका राजश्री वावेकर यांनी प्राथमिक शाळेतल्या मुलांनी मातृभाषेतून शिक्षण घेऊन पुढे आले पाहिजे आणि समाजाची जाण असलेले सुसंस्कारित विद्यार्थी घडले पाहिजेत, असे मत यावेळी व्यक्त केले.

## कृषी विकास कार्यशाळेचे आयोजन

**। खांब-रोहा । वार्ताहर ।**

भारत विकास संगम आयोजित रायगड जिल्हास्तरीय कृषी विकास कार्यशाळेचे दि. ३० रोजी स. ९ ते सायं.६ या वेळेत रोहा तालुक्यातील कोकबन येथे करण्यात आले आहे. मातोश्री रिसॉर्ट व कृषी पर्यटन केंद्र, कोकबन येथे संपन्न होणाऱ्या या कार्यशाळेप्रसंगी संरक्षक भारत विकास संगम संजय पटेल बापुजी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्ज्वला बानखेळे, कृषीतज्ज्ञ लातूर महादेव गोमारे, पं.स. उपसभापती रामचंद्र सकपाळ आदी उपस्थित राहणार आहेत.

## मतदार जनजागृतीकरिता निबंध, चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

मतदान प्रक्रियेत नागरिकांसह युवानी सहभागी होण्यासाठी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा केला जातो. यांचे निर्देशाप्रमाणे मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

मुरूड शहरासह तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालये यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन स्वरूपात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या निबंध स्पर्धेत ५१ स्पर्धाकांनी, चित्रकला स्पर्धेत ३४



स्पर्धकांनी, तर वक्तृत्व स्पर्धेत सात जणांनी सहभाग नोंदविला.

निबंध स्पर्धेत ८वी ते १२वी वयोगटातील दिव्या ठाकूर, समुद्रा मढवी, सुरभी प्रवीण कोतवाल, रिया संजय कोतवाल यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. तर, एफवाय या वयोगटातील दरोग इकरा मुबीन, अन्सारी नयुफ खलील, सुदर्शन दिवेकर, कागदी सल्वा सर्फराज, भालदार सना समीर यांना गौरविण्यात आले.

चित्रकला स्पर्धा ८वी व १२वी वयोगटातील मदिहा अब्दुला जलील पंगारकर, तहरिन अन्सार चोगले, अनुष्का दांडेकर, अजबा छापेकर यांनी तर एफवाय या वयोगटातील दखनी फातिमा लियाकर, मुकादम स्वालेहा अब्दुलसललाम, नक्तारे उरुमा मोअज्जम, मलेकर मरीयम मजहर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

## ३० शिक्षकांचा गौरव

**। अलिबाग । वार्ताहर ।**

चिल्ड्रेन्स फ्युचर इंडिया सामाजिक संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शिक्षकांकरिता इंग्रजीची अध्ययनाचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यात उत्तम यश प्राप्त करणाऱ्या ३० शिक्षकांचा गौरव संस्थेच्या वतीने करण्यात आला.

गेली अनेक वर्षे चिल्ड्रेन्स फ्युचर इंडिया ही संस्था रायगड जिल्ह्यात गरीब व गरजू, निराधार मुले त्यांचे कुटुंब व समाजाकरिता कार्यरत असून १२३ गावात कार्य करीत आहे. नुकताच या संस्थेतर्फे शिक्षकांकरिता इंग्रजीचा कोर्स सुरू केला होता. त्यामध्ये ३० शिक्षकांनी अतिशय उत्तम पद्धतीने यश प्राप्त केले. त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. मुख्य म्हणजे, या सर्व सरकारी शाळा असून, त्या सर्व शिक्षकांना व्यवस्थित इंग्रजी बोलता येत आहे. चिल्ड्रेन्स फ्युचर इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर देशमुख यांनी शिक्षकांचे कौतुक व अभिनंदन करून उत्तम मार्गदर्शनही केले.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- WORK FROM HOME ९५०३०५८६२४
- पाहिजेत : हेल्पर, सुपरवायझर व शिकाऊ कारागीर (वय १८ ते २५ वर्षे) मोटारसायकल चालविता येणे आवश्यक. शिक्षण व अनुभवाची अट नाही. हजारे एन्टरप्रायजेस, मारुती नाका अलिबाग-९८२२००१८५३
- नागाव मधील हॉटेलमध्ये कामासाठी रिसेप्शनीस्ट व ऑल-रॉऊंडर कुक पाहिजे. संपर्क-९९२१९७८०८०
- नामांकीत कंपनीसाठी जागा विकत घेणे आहे J.V.प्रापर्टी, बंगलो प्रोजेक्ट व कमरशील अलिबाग, मांडवा, मुरुड येथे संपर्क - ९९६०८०७८२८/९९२३१३५४४४/९०२२९६६७०२.
- ड्रायव्हर हवा आहे. Pickup/407 टेम्पोवर अनुभवी ड्रायव्हर हवा आहे. १४000/१५000 गोविंद गोपाळ अँड कंपनी झिराड- ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- 1 BHK नवीन बिल्डींग अलिबाग समुद्रापासून ५ मिनिटे अंतरावर फुल फर्निश, टिव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, बेड, कपाट, सोफा-सेट, पडदे, किचन ट्रॉली, ए.सी. वॉटर फिल्टर, गिझर, फायनल ३२ लाख. संपर्क- ८८०५५४०४६४
- डिश टीव्ही कंपनीसाठी 'Technician' आहेत. पगार ७०००-९००० रुपये स्वत:ची बाईक असावी. Contact- 7448202022/7721931234

जाहिरातीसाठी संपर्क

☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## आदिवासी विद्यार्थ्यांना दिली मायेची ऊब

### भाविका जामघरेची अनोखी समाजसेवा

*। नेरळ । वार्ताहर ।*

***नेरळजवळील बिरदोले गावातील महाविद्यालयीन तरुणीने सुरु केलेल्या वीटभट्टीवरील आदिवासी मुलांच्या सुरु असलेल्या शाळेत कर्जतचे व्यापारी किरण परमार यांनी भेट दिली. त्यांच्या माध्यमातून सर्व ३३ मुलांना कडाक्याच्या थंडीपासून बचाव करण्यासाठी ऊबदार कपडे आणि खाऊचे वाटप त्या ठिकाणी जाऊन केले. आदिवासी मुलांनी पाहुण्यांचे स्वागत एकसाथ नमस्ते आणि टाळ्या वाजवून केले.***



*नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारी भाविका भगवान जामघरे या विद्यार्थिनीने दामत येथे असलेल्या आठ वीटभट्टीवर काम करणाऱ्या स्थलांतरित आदिवासी कातकरी समाजाच्या मुलांसाठी शाळा सुरु केली आहे. त्या शाळेत शिकणाऱ्या मुलांची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून झाल्यानंतर कर्जत येथील किरण परमार या व्यापारी वर्गाने व्यावसायिक यांनी संपर्क साधून मुलांना भेटवस्तू, ऊबदार कपडे आणि खाऊ देण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार किरण परमार यांनी दामत येथे जाऊन वीटभट्टीवर शाळेत शिकतात याची माहिती घेतली. त्यावेळी त्यांच्या माध्यमातून पहिली ते सातवीच्या सर्व ३३ मुलांना ऊबदार कपडे व खाऊचे वाटप केले. त्यावेळी रायगड भूषण संतोष पेरणे, किशोर गायकवाड आणि भगवान जामघरे हे उपस्थित होते. यावेळी किरण परमार यांनी या मुलांसाठी आणखीन कशाची मदत लागली तर सांगा असे भावना जामघरे यांना सांगितले.*

### कौतुकास्पद कार्य

**वीटभट्टीवर काम करणाऱ्या आदिवासी बांधवांच्या मुलांचे थंडीपासून संरक्षण व्हावे, यासाठी भाविका जामघरे या तरुणीने पुढे येत मुलांना उबदार कपडे वाटप केलेत. तिच्या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये






छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**श्री. सुरेश बाळकृष्ण म्हात्रे, चौल, अलिबाग**

**कै. अनिता अरविंद म्हात्रे, स्मृतिदिन, गुंजिस, अलिबाग**

## संपादकीय

# वाईनच्या देशा

राज्यातील द्राक्ष बागायतदार तसेच अन्य फळांपासून वाईन बनवणाऱ्या उद्योगांना चालना देण्यासाठी सुपर मार्केट तसेच ठराविक दुकानांतून वाईन विक्रीस परवानगी देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने गुरुवारी झालेल्या बैठकीत घेतला आहे. राज्यातील मुख्य विरोधी पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीने या निर्णयाला कडाडून विरोध केला असून महाविकास आघाडीचे हे सरकार नेमके आहे तरी कुणाचे, असा सवाल विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. त्यामुळे अपेक्षेनुसार या वादग्रस्त विषयाबद्दल जोरदार वादाला तोंड फुटले असून शिवसेना खासदार संजय राऊत यांनी सरकारच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. आपला तीव्र विरोध नोंदवताना फडणवीस यांनी म्हटले आहे की, राज्यात पेट्रोल-डिझेलऐवजी दारू स्वस्त असून काही जिल्ह्यातील दारूबंदी संपवून नवीन दारूविक्री परवाने देण्यात आले. आता सुपर मार्केटमध्ये दारूविक्रीला परवानगी देऊन घरोघरी दारू पोचविण्यात येत आहे. तसेच भाजपचे आमदार आशिष शेलार यांनी 'ठाकरे सरकार हे मद्यप्रेमी असून राज्य सरकारने भविष्यात नळावाटे चोवीस तास दारु उपलब्ध करून दिल्यास नवल वाटू नये', अशा भाषेत टीका केली आहे. त्याला प्रत्युत्तर देताना संजय राऊत यांनी 'वाईन हे फळांपासून शेतकरी तयार करत असलेले एक उत्पादन आहे. वाईन विक्री रोखायला देशात दारुबंदी आहे का?' असा सवाल केला आहे. खरे तर हा विषय नवीन नाही आणि त्यावर खूप वाद यापूर्वी झाला आहे. अनेक वर्षांपूर्वी शरद पवार यांनीच सर्वप्रथम ही कल्पना मांडली होती. तेव्हा सुपरमार्केट हे नव्यानेच प्रस्थापित व्हायला लागले होते आणि महाराष्ट्रातील शेतकरी मोठ्या प्रमाणात वाईनचे अथवा वाईन बनवण्यास उत्तम असलेल्या द्राक्षांचे वाण राज्यात रुजवून भरघोस उत्पादन करू लागले होते. मात्र सामाजिक संकेत आणि मद्याबाबतची मते अधिक दृढ होती आणि वाईनचा प्रसारही खूप मर्यादित होता. मात्र गेल्या दोन दशकांत त्यात खूप बदल झाला असून अनेक मायक्रो उद्योग या क्षेत्रात सुरू झाले असून सुपरस्टोअर्सचा विस्तारही वाढला आहे. तसेच, महाराष्ट्रातील नाशिक, पुणे हे जिल्हे उत्कृष्ट वाईनच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या द्राक्षांच्या पिकांसाठी उत्तम ठरले आहेत. तेथील वाईन उत्पादने ही जगभरात मान्यताप्राप्त बनली आहेत. त्यामुळे वाईनला दारूच्या गटातून बाजूला करून ती सुपरमार्केटमध्ये उपलब्ध करण्याची मागणी होत होती. द्राक्षातून बनणारी वाईन हे प्रमुख उत्पादन असले तरी चिकू, पेरू आदींचीही वाईन बनवली जाते, ज्याचे पीक महाराष्ट्रात मुबलक असते. त्यामुळे वाईन विक्री वाढली तर अधिकाधिक शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. कारण आताही वाईन विकली जातेच आणि ती केवळ मद्यविक्री परवानाधारक दुकानातूनच. शेतकऱ्यांची मुबलक पीक आल्याने आणि ती टिकवून ठेवण्याची योग्य व्यवस्था नसल्याने वाया जाणाऱ्या द्राक्षापासून अनेक फळांना या उद्योगाकडून मागणी येईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळू शकतो. यात नित्यनेमाने पुरवठा आवश्यक असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारू शकते, तसेच शेतीत अधिक गुंतवणूकही होण्याची शक्यता आहे. शेतकरी पीक घेतो इथपासून ग्राहक वाईन विकत घेतो इथपर्यंतचा प्रवास खूप लांबलचक असतो. दरम्यान अनेक महिन्यांचा कालावधी जसा असतो तसा त्यात पुरवठा, विपणन, विक्री, वाहतूक, साठवणूक, जाहिरात अशा अनेक प्रक्रिया आणि टप्पे असतात. त्यात विविध व्यावसायिक आवश्यक असतात आणि त्यांच्या सहभागाशिवाय ही सप्लाय चेन पूर्ण होत नाही. त्या दृष्टीनेही या विषयाकडे पाहिले पाहिजे. विरोध करणाऱ्या भाजपच्या ज्या नेत्यांचा या व्यवसायात सहभाग आहे, ते विरोध आहे म्हणून वाईन व्यवसायातील सहभाग थांबवतील का, याचे उत्तर स्पष्ट आहे. वाईन विकली जातेच, ती उपलब्ध होण्याची ठिकाणे वाढणार. त्यामुळे शेतकऱ्यांकडे मागणी वाढणार. यात अनेक शेतकऱ्यांचे पैसे अडवले जाणे आदी प्रकार होऊ शकतात. त्याकडे लक्ष असायला हवे. कारण, शेतकऱ्याने पिकवले तरच ते इतरांना वाईनसाठी उपलब्ध होणार. परंतु शेतकऱ्यांना वेळीच पैसे न देता कालांतराने पैसे देण्याचे प्रकार घडू शकतात. मोठ्या वायनरी या स्वत:चे पीक घेतात किंवा शेतकऱ्यांना करारबद्ध करून घेतात. यात जो निर्णय शेतकऱ्यांच्या हिताचा म्हणून घेतला आहे त्यात शेतकऱ्याचे हित जपले जाईल याची खातरजमा सर्वप्रथम शेतकऱ्याने स्वत: किंवा या पीक उत्पादक संघटनांनी एकत्र येऊन केली पाहिजे.

# डॉ. बाविस्करांचा उचित पद्मश्री सन्मान

वसंत चौलकर

*एकेकाळी विंचू दंशाने मृत्यूचे प्रमाण कोकणात खूप मोठे होते. त्या भागातील विंचवाचे विष अधिक जहाल असे आणि त्याच्यामुळे झालेल्या विविध परिणामांमुळे रुग्ण दगावत असे. त्या लक्षणांचा सूक्ष्म अभ्यास करुन डॉ. बावस्कर यांनी उपचार पद्धती बदलली. औषधांचे पर्याय शोधले. त्यामुळे एकेकाळी वर्षभरात मिळून जिथे काहीशे माणसे मदत असत तेथे आता क्वचित एखादे वेळी एखादा मृत्यू होतो. पोलादपूर, महाड परिसरात बावस्कर दाम्पत्याला लोक दैवतासमान मानतात. या दोन्ही उभयतांनी रुग्णांची सेवा केल्याने त्यांना केंद्र सरकारने पद्मश्री पुरस्कार जाहीर केला आहे. त्याबद्दल डॉ. हिम्मनाथ बाविस्कर उभयतांचे अभिनंदन.*

अनेकजण सरकारी नोकरीसाठी धडपडत असतात आणि ती मिळाली की आपल्या घराजवळच बदली हवी यासाठी ते प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. या पार्श्वभूमीवरच थेट विदर्भातील अत्यंत कोरड्या हवामानातून रायगड जिल्ह्यातील महाड पोलादपूरसारख्या अत्यंत दमट हवामानातून येऊन आयुष्यभर विनातक्रार सेवा करीत राहणे आणि येणाऱ्या रुग्णांवर उपचार करण्यात धन्यता न मानता त्यांच्या समस्यांच्या मुळाशी जाऊन त्यावर उपाय शोधणे हे काम सोपे नसते. डॉ. हिम्मतराव बाविस्कर ऑगस्ट १९७६ मध्ये पोलादपूर जवळ बिरवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुजू झाले तेव्हापासून ४० ते ४५ वर्षाहून अधिक काळ त्यांनी महाड-पोलादपूर परिसरातच काढला. त्यांनी सातत्याने रुग्णसेवा केली. त्यांच्याइतकेच, किंबहुना त्यातून अधिक कौतुक त्यांच्या पत्नीचे स्वतः एम.बी.बी.एस. असलेल्या डॉ. प्रमोदिनी यांनी आपल्या पतीच्या या व्रताला मनः पूर्वक साथ दिली. डॉ. बावस्कर सुद्धा आपल्या पत्नीचे मनापासून कौतुक करतात. या कामाच्या मागची प्रेरणा माझी पत्नीच आहे.

विंचू दंश आणि डॉ. बावस्कर हे नाते अजोड असे आहे. किंबहुना त्याच कार्यासाठी त्यांची ओळख सातासमुद्रापार पोहचली. एकेकाळी विंचू दंशाने मृत्यूचे प्रमाण कोकणात खूप मोठे होते. त्या भागातील विंचवाचे विष अधिक जहाल असे आणि त्याच्यामुळे झालेल्या विविध परिणामांमुळे रुग्ण दगावत असे. त्या लक्षणांचा सूक्ष्म अभ्यास करुन डॉ. बावस्कर यांनी उपचार पद्धती बदलली, औषधांचे पर्याय शोधले. त्यामुळे एकेकाळी वर्षभरात मिळून जिथे काही शे माणसे मरत असत तेथे आता क्वचित एखादेवेळी एखादा मृत्यू होतो.

विंचूदंशा खालोखाल कोकणात सर्प दंशाने बळी जात असत. आजही ते प्रमाण फार कमी झाले नाही. विंचू दंशावर झपाट्यासारखे काम झाले. उपचारांची माहिती पोहोचली आणि उपचार पद्धती बदलल्याने प्राणहानी कमी झाली. सर्पदंशाच्या बाबतीत ते तेवढ्या वेगाने झाले नाही. सर्पदंशाचे अनेक रुग्ण येत असतात. जगभरात सपाच्या साधारण २०० जाती आहेत. त्यातील ५२ विषारी आहेत. यापैकी ४ जाती भारतात जास्त प्रमाणात आढळतात. नाग, मणेर, घोणस आणि फुरसे. कोकणात मणेरच्या दंशाचे प्रकार अधिक. हा साप या भागात जास्त प्रमाणात आढळतो. काही विशिष्ट



काळात तो अधिक सक्रीय होतो. पावसाळ्यात भातशेतीमुळे त्याच्या बिळाची तोंडे बंद होतात. तोच काळ त्याच्या विणीचा असतो. त्यासाठी तो आडोसा शोधत मानवी वस्तीत येतो, कुठेतरी आडोशाच्या, कमी वर्दळीच्या, लाकडी ठेवलेल्या जागांसारख्या अडचणीच्या जागी तो लागतो. त्याला माणसाचा धक्का लागला की तो दंश करतो. पण तो इतका सूक्ष्म असतो की, पटकन लक्षात येत नाही. थोडा वेळ गेला की पोटात दुखू लागते, उलटी होते, त्यातच पक्षघाताचा धक्का बसतो आणि श्वास बंद होऊन दंश झालेली व्यक्ती दगावते.

ही सारी संशोधने करुन निष्कर्षाला येण्यासाठी डॉक्टरांनी शेकडो पेशंट तपासले. सर्वांच्या नोंदी घेतल्या. ते स्वतः ग्रामीण भागात, गावोगाव भटकले, सामाजिक स्थितीचे निरीक्षण केले.

वैद्यकीय शिक्षण संपवून डॉक्टर कॉलेजबाहे पडतात, तेव्हा ते एक शपथ घेत असतात. त्याला समाजसेवेचा, सामाजिक बांधिलकीचा स्पर्श असतो. सगळेच डॉक्टर ती शपथ घेतात. पण खूप कमी डॉक्टर ती निभावतात. डॉ. हिम्मतराव बावस्कर आणि त्यांची पत्नी डॉ. प्रमोदिनी यांच्यासारखे डॉक्टर ती निभावण्यासाठी आपले आयुष्यच पणाला लावतात. त्यातून त्यांना होणारी आर्थिक प्राप्ती खूप कमी असते, पण त्या पलिकडे त्यांनी जे कमावलेले असते ते कुठल्याही मापाने मोजता येण्यासारखे नसते. अशी माणसे मर्त्य जगात 'वेडी' गणली जातात. पण ती अपार श्रीमंत आणि विलक्षण उंचीची असतात. त्यांची श्रीमंती सदिच्छांमध्ये मोजावी लागते आणि उंची सर्व सामान्यांच्या नजरेत... मूळ बुलढाणा जिल्ह्याचे सुपुत्र असलेले आणि कोकणातील महाड परिसरात लोकसेवा करणारे डॉ. बावस्कर दाम्पत्य सर्वार्थाने प्रेरक ठरावेत. नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून १९७६ मध्ये त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि त्याच वर्षी ते बिरवाडीला वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू झाले.

याच गावात अतिविषारी विंचवाशी त्यांची पहिली भेट झाली. त्याच्या गावांकडे विंचू दंशाचे काही प्रकार होतात पण त्यामुळे कोणी मरत नव्हते. पण इथे इंचू चावून मेल्याच्या असंख्य घटना त्यांच्यासमोर आल्या आणि त्यातून त्यांच्या संशोधक वृत्तीने उचल खाल्ली त्यात परिपूर्ण संशोधन करुन त्यावरील उपाय शोधूनच ते थांबले. त्यांच्या 'बॅरिस्टरचं कार्ट' या आत्मचरित्रातही हे सारे विस्ताराने आलेले आहे. त्यांनी त्या विषयावर संशोधन करताना आधीच्या चार-पाच वर्षांतील विंचू दंशाच्या रुग्णांचे केस पेपर काढले, नाडीचे ठोके, रक्तदाब, श्वसनक्रिया, शरीराचे ताप, मान, हृदय व फुफ्फुसात झालेले परिणाम यावर त्यात कसल्याही नोंदी नव्हत्या. काही ठिकाणी 'हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू' इतकाच उल्लेख होता. ते महाडमध्ये काही वरिष्ठ व खाजगी डॉक्टरांना भेटले. तेथेही अनुभव तसाच आला. त्यातच विंचू दंशांमुळे झालेल्या दुर्दैवी मृत्यूची असंख्य उदाहरणे त्यानिमित्ताने त्यांच्यासमोर येऊ लागली. अधिक खोलात जाता त्यांना असे कळले की, १९६१ मध्ये डॉ.सी.एम. मुंडले यांनी ब्रिटीश मेडिकल जर्नलमध्ये कॉलेजच्या ग्रंथालयात जाऊन त्यांनी तो अंक शोधला. त्यात डॉ. मुंडले यांनी ७८ केसेस अभ्यासल्या होत्या. त्यातील २३ जण 'पल्मोनरी इंडिया'ने दगावल्या. विशेष म्हणजे अमायनो फायलीन आणि पेथेडीन या पारंपारिक औषधांचा त्यांच्यावर काही परिणाम झालेला नव्हता. डॉ. बावस्कर स्वतः डॉ. मुंडले यांना भेटायला रायगड जिल्ह्यातील गोरेगाव येथे गेले. त्यांनी देश-परदेशात केलेला पंचड पत्रव्यवहार पाहून ते चकित झाले. वयाच्या ७८ व्या वर्षी त्यांचे चाललेले काम पाहून ते थक्क झाले. इथून खऱ्या अर्थाने त्यांची शोधयात्रा सुरु झाली.

त्यांच्या चाचण्या सुरुच होत्या. दंशामुळे हृदय कमजोर झालेले असताना त्याच्यावरील ताण वाढल्याने हृदयक्रिया बंद पडू शकते, असे वाटल्याचे त्यांनी हृदयाचा रक्तपुरवठा आवलप हिने नियंत्रण करण्याचाही प्रयत्न केला पण यश आले नाही. सप्टेंबर १९७६ ते फेब्रुवारी १९७५ या काळात एकंदर २० रुग्णांचा सविस्तर अहवाल घेऊन जे.जे. मध्ये डॉ. शांतीलाल शहा यांना भेटले. तेव्हा ते इंडियन हार्ट जर्नलचे संपादकही होते. त्यांनी डॉक्टरांच्या अहवालावर त्यांच्या मासिकात अर्धे पान टिप्पण प्रसिद्ध केले. त्यानंतर त्यांनी आणखी १७ केसेसचा अभ्यास केला. त्या नोंदीवर आधारीत प्रयोग डॉ. एस.एस. जाधव यांनी केला आणि गिनिपिक ती प्रयोग बावस्करांच्या निरीक्षणाचा संदर्भ घेऊन १९७८ मध्ये 'लॅस्वेट' या आंतरराष्ट्रीय जगप्रसिद्ध नियतकालिकात प्रसिद्ध झाला.

दरम्यान आपल्याकडील विंचू दंशांच्या ५१ केसेसवरील नोंदीवर आधारीत एक विस्तृत निबंध डॉ. बावस्करांनी लिहिला. या दरम्यान त्यांनी एम.डी. पूर्ण केले आणि त्यानंतर परत कोकणातच पोस्टिंग मागितली. खरेतर एम.डी. नंतर त्यांना त्यांच्या गावापासून जवळपास पोस्टिंग देण्याची तयारी प्रशासनाने दाखविली होती. पण आपण हाती घेतलेले कार्य पूर्ण करण्यासाठी त्यांना परत कोकणातच जायचे होते. तेथे विंचू दंशाचे असंख्य पेशंट त्यांची प्रतीक्षा करीत होते. म्हणून ऑगस्ट १९८२ मध्ये ते पोलादपूर येथे रुजू झाले. त्या आधीने अंबाजोगाईच्या डॉ. प्रमोदिनी यांच्याशी विवाहबद्ध झाले. पोलादपूरात दाखल झाल्यानंतर जोडीने त्यांनी रुग्णसेवेला प्रारंभ केला. १९८३ मध्ये विंचू दंशावरील त्यांच्या उपायांना पहिले यश आले आणि त्यांनी एका पेशंटला वाचविले. त्यासाठी त्यांना अनेक सव्यापसव्य करावे लागले. जोखीम उचलावी लागली. विंचू दंशावर कुणी डॉ. हिम्मतराव बाविस्कर पोलादपूर येथे संशोधन करीत आहेत आणि त्यांनी एक मुलाला वाचविले आहे. ही बातमी वाऱ्याच्या वेगाने कोकणभर पसरली आणि मग पनवेल ते रत्नागिरीपर्यंतच्या पट्ट्यांतील रुग्णांचा लॉस रात्री-अपरात्री पोलादपूरच्या दवाखान्यात लोटू लागला. १९८४ मध्ये त्यांनी १२६ रुग्ण जगविले ही सारी निरिक्षणे आणि निष्कर्ष १९८६ मध्ये 'लेन्सेट' मध्ये प्रकाशित झाले. पण त्याची फारशी चर्चा कुठे झाली नाही.

# सांगा कसे जगायचे?

दिवसा ढवळ्या पोलिसांच्या गोळीबार सरावाच्या गोळ्या घरात घुसत असतील तर ग्रामस्थांनी कसे जगायचे असा कार्ले ग्रामस्थांनी केलेला सवाल योग्यच आहे. कार्ले गावामध्ये सुमारे सव्वादोनशे घरे आहेत. परहूर पाडा येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रावर सुरू असलेल्या सरावादरम्यान बंदुकीतून सुटलेल्या गोळ्या कार्ले गावात येऊन पडत असतात. मागील दोन तीन वर्षात सहा घरात गोळ्या येऊन घुसल्या आहेत. गेल्या वर्षी घराच्या परसावात असलेल्या पाण्याच्या टाकीत गोळी घुसली होती. याचवेळी त्या घरातील एक लहान मुलगा तिथेच होता. सुदैवाने त्याला कोणतीही इजा झाली नाही. गुरुवारी देखील दुपारच्या सुमारास पोलिसांचा गोळीबार करण्याचा सराव सुरू असताना बंदुकीतून झाडलेली गोळी कार्ले गावातील मंगेश नाईक यांच्या घराच्या छपरावरील पत्र्यातून आत घुसली. तर उदय पाटील यांच्या ओटीवरदेखील पत्रा फोडून भिंतीवर गोळी आदळली. यावेळी वत्सला बाबू पाटील (७२) या बसल्या होत्या. त्यांच्या डोक्याजवळून गोळी भिंतीवर आदळून अंगणात पडली. सुदैवाने त्या बसल्या असल्याने गोळी त्यांच्या शरीरावर लागली नाही. अन्यथा जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मंगेश नाईक यांचा मुलगा देखील नेहमी आपल्या माळ्यावर अभ्यास करण्यासाठी बसत असतो. सुदैवाने घटना घडली होती तेंव्हा तो तिथे नव्हता. त्यामुळे गावामध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या वर्षातील घटनेनंतर ग्रामस्थांनी शेकापक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्याकडे धाव घेतल्यानंतर त्यांनी प्रशासनाला याबाबत योग्य ती कार्यवाही करुन प्रशिक्षण केंद्र सुरक्षित स्थळी हलविण्याची सुचना केली होती. मात्र पोलीस प्रशासनाने संरक्षक भिंत उभारुन ग्रामस्थांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा काहीही उपयोग झाल्याचे कालच्या घटनेने समोर आले. सराव सुरु करण्यापूर्वी पोलीस प्रशासनाने ग्रामस्थांना सुचित केले असले तरी त्यात काहीच काळवेळ नसल्याने ग्रामस्थांमध्ये संभ्रम होताच. त्यात या घटनेने दहशत कायम आहे. त्यामुळे यावर योग्य तो मार्ग काढण्याची गरज आहे. अन्यथा भविष्यात एखादी दुर्घटना घडली तर त्याला कोण जबाबदार राहील?

# भैरवगडावरची चढाई!

यात्रा-वात्रा
भारत रांजणकर

सह्याद्रीच्या कडेकपारीत लहानाचे मोठे झालेले अनेक गिर्यारोहक, प्रस्तरारोहक विविध कठिण मोहिमा सहज पार पाडत असतात. आपले हे दऱ्या खोऱ्यातले प्रेम त्यांना त्यासाठी प्रोत्साहन देत असते. सुधागड तालुक्यातील पोटलज खुर्द येथील प्रसिद्ध प्रस्तरारोहक व मॅकवीला द जंगलयार्ड चे संस्थापक मॅकमोहन हुले व त्यांचे सहकारी आयुष सिंग यांनी नुकतेच मोरोशी भैरवगडाची कठीण ४५० फूट प्रस्तर भिंत १० तासांत सर केली आहे. या अवघड चढाईत अनेक जण माघारी फिरतात. मात्र जिद्द व प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर या दोघांनी ही मोहीम फत्ते केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या टीमने आजवर अनेक कठीण किल्ले व गड सर केले आहेत. ठाणे जिल्ह्यातील माळशेज येथील भैरवगड (मोरोशी) किल्ल्याची उंची ४००० फूट आहे. भैरवगडाचा बालेकिल्ला अशाच मुख्य डोंगररांगेपासून अलग झालेल्या बेसॉल्ट खडकाच्या ४५० फूट उंच, सरळसोट भिंतीवर वसलेला आहे. त्यामुळे यावरची चढाई अत्यंत कठीण श्रेणीमध्ये येते. ही मोहिम करत असताना त्यांनी जवळपास दोनशे लिटर बॅकपॅकसोबत दोघांनी कारने प्रवास केला. प्रस्तर भिंत ही ८० अंश कोणात असून ४५० फूट असा प्रस्तर मार्ग ६३ बोल्टचा वापर केला आहे. चारही बाजूंनी सोसाट्याचा वारा वाहत असतो. त्यावेळी उंचीवर ऐकायला येणं शक्य नसतं, खूप मेहनत कसोटी लागते. वर चढत असतांना वेळही वाया जातो. म्हणून काही लोक ही मोहीम अर्ध्यातच सोडून जातात. मात्र या दोघांनी ही मोहीम खूप जिद्दीने पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. इथे टोकावर जाण्यासाठी कोणताही बोल्ट नाही. ७० अंश कोणातच १०० फूट मातीचा घसरडी अशी चढाई केली आहे. सोमवारी (ता.१७) सकाळी नऊ वाजता प्रस्तरारोहणाला सुरुवात केली ते सायंकाळी सात वाजता म्हणजे तब्बल १० तासांनी अंतिम टोकावर ते दोघे पोहचले. या चढाईत दोघांचीही कसोटी लागली. आतापर्यंत रायगडच्या अनेकांनी अवघड अशा चढाया केल्या आहेत. त्यात मॅकमोहन हुले यांचाही आता समावेश झाला आहे. भविष्यात अशाच अनेक अवघड चढाया सुरक्षितरित्या त्यांनी सर करून रायगडचे नाव हिमालयापार नेवो याच शुभेच्छा!




भगवान श्रीकृष्णांनी मधू दैत्याचा वध केला होता आणि आता आपले कर्तव्य करीत असताना ज्या अज्ञानाने आपल्याला ग्रासले आहे त्या अज्ञानरुपी दैत्याचा श्रीकृष्णांनी वध करावा अशी अर्जुनाची इच्छा होती. करुणेचा उपयोग कुठे करावा हे कोणालाही समजत नाही. बुडणाऱ्याच्या वस्त्राबद्दल करुणा करणे व्यर्थ आहे. अज्ञानरुपी महासागरात बुडालेल्या मनुष्याला त्याच्या बाह्य वस्त्ररुपी स्थूल शरीराचे रक्षण करुन वाचविता येत नाही. जो हे जाणत नाही आणि केवळ बाह्य वस्त्राबद्दल शोक करतो त्याला शूद्र किंवा अनावश्यक शोक करणारा असे म्हटले जाते. अर्जुन हा क्षत्रिय होता आणि अशा प्रकारच्या वर्तणुकीची त्याच्याकडून अपेक्षा नव्हती. परंतु भगवान श्रीकृष्ण अज्ञानी मनुष्याचा शोक नष्ट करु शकतात आणि याच उद्देशाने त्यांनी भगवद्गीता सांगितली. सर्वोच्च अधिकारी भगवान श्रीकृष्ण यांनी सांगितल्याप्रमाणे हा अध्याय आपल्याला भौतिक शरीर आणि आत्मा यांच्या पृथक्करणात्मक विवेचनाद्वारे आत्मसाक्षात्कारासाठी मार्गदर्शन करतो. जेव्हा एखादा मनुष्य सकाम कर्मांप्रति अनासक्त होऊन कार्य करतो आणि आत्म्याच्या संकल्पनेत दृढपणे स्थित होतो, त्यालाच या प्रकारच्या साक्षात्कार प्रतीची शक्यता आहे.

श्रीभगवानुवाच
कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ।।२।।

श्री भगवान उवाच- श्रीभगवान म्हणाले; कुतः- कोठून; त्वा- तुला; कश्मलम्- अशुद्ध; इदम्- हा शोक; विषमे- या संकटाच्या वेळी; समुपस्थितम्- प्राप्त झाले; अनार्य- ज्यांना जीवनाचे मूल्य कळत नाही अशा व्यक्ती; जुष्टम्- आचरलेले; अस्वर्ग्यम्- जे उच्चतर लोकांत नेत नाहीत; अकीर्ति- दुष्कीर्ती; करम्- कारण; अर्जुन- हे अर्जुन.

पुरुषोत्तम श्रीभगवान म्हणाले : हे अर्जुना! तुझ्यामध्ये अशा अशुद्ध गोष्टी कशा आल्या? ज्या मनुष्याला जीवनाच्या मूल्यांचे ज्ञान आहे त्याला या गोष्टी मुळीच शोभत नाहीत. या गोष्टी मनुष्याला उच्चतर लोकांत जाण्यात नाही, तर त्या त्याच्या दुष्कीर्तीला कारणीभूत होतात.

तात्पर्य : 'कृष्ण' म्हणजे पूर्ण पुरुषोत्तम भगवान. म्हणून संपूर्ण गीतेमध्ये श्रीकृष्णांचा उल्लेख भगवान असाच केला आहे. भगवान रुपाचा साक्षात्कार हा परम सत्याच्या साक्षात्कारामध्ये अंतिम साक्षात्कार आहे. परम सत्याचा साक्षात्कार तीन अवस्थांमध्ये होतो; निर्विशेष ब्रह्म, सर्वव्यापी आत्मा, परमात्मा किंवा सर्व जीवांच्या हृदयामध्ये स्थित परम सत्याचे स्वरुप आणि भगवान किंवा पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्ण, श्रीमद्भागवतात (१.२.११) परम सत्याची संकल्पना याप्रमाणे विवेचित करण्यात आली आहे.

वदन्ति तत्तत्वविदस्तत्वं यज्ज्ञानमद्वयम् ।
ब्रह्मेति परमात्मेति भगवानिति शब्द्यते ।।

'परम सत्याचे ज्ञान असणारे परम सत्याचा साक्षात्कार ज्ञानाच्या तीन अवस्थांमध्ये करतात आणि या सर्व एकच आहेत. परम सत्याच्या अशा अवस्थांना ब्रह्म, परमात्मा आणि भगवान असे म्हटले जाते.'

ही तीन दिव्य स्वरुपे सूर्याच्या उदाहरणावरुन स्पष्ट करता येतात. सूर्यालाही विविध प्रकारची तीन स्वरुपे आहेत. उदाहरणार्थ, सूर्यप्रकाश, सूर्याचा पृष्ठभाग आणि प्रत्यक्ष सूर्यलोक, जो केवळ सूर्यप्रकाशाचे अध्ययन करतो तो प्राथमिक अवस्थेतील विद्यार्थी आहे; जो सूर्याच्या पृष्ठभागाला जाणतो तो अधिक प्रगतावस्थेमध्ये आहे आणि जो सूर्यलोकामध्येच प्रवेश करतो तो सर्वश्रेष्ठ आहे. सामान्य विद्यार्थी जे केवळ सूर्यप्रकाश, त्याचे विश्वव्यापकत्व आणि निर्विशेष अशा दैदीपम्यमान प्रकाशाचे स्वरुप जाणण्यात समाधान मानतात त्यांची तुलना, परम सत्याच्या केवळ ब्रह्म स्वरुपाचा साक्षात्कार करु शकतात त्यांच्याशी करता येईल. जो विद्यार्थी आणखी थोडा प्रगत आहे तो सूर्यगोलाचे स्वरुप जाणू शकतो व त्याची तुलना परम सत्याच्या परमात्मा स्वरुपाचा साात्कार करणाऱ्याशी करता येईल

(क्रमशः)

(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)

## लोकसंसद

### संवेदनशील बहुआयामी व्यक्तिमत्त्व हरपले



मुक्तांगणचे संस्थापक, ज्येष्ठ समाजसेवक, चित्रकार, पत्रकार, प्रसिद्ध लेखक, बालसाहित्यकार डॉ अनिल अवचट (बाबा) यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने एक संवेदनशील, बहुआयामी व्यक्तिमत्त्व हरपलं आहे. डॉ अनिल अवचट यांचा जन्म २६ ऑगस्ट १९४४ रोजी पुणे जिल्ह्यातील ओतूर या गावी झाला. लहानपणापासून अभ्यासात हुशार असणाऱ्या अनिल अवचट यांनी पुणे येथील बी जे मेडिकल कॉलेजमधून एम बी बी एस चे शिक्षण घेतले. कॉलेज जीवनात असतानाच त्यांनी अनेक चळवळीत भाग घेतला. युवक क्रांती दलाचे ते सक्रिय कार्यकर्ते होते. डॉ. अनिल अवचट हे पेशाने पत्रकार आणि लेखक. आपली लेखणी त्यांनी कायमच सामान्य जनतेच्या हितासाठी वापरली. डॉ अनिल अवचट हे स्वतः पत्रकार होते तरी त्यांनी पत्रकारितेतील व्यवसायिकतेला नेहमीच नकार दिला. त्यांनी आपली पत्रकारिता नेहमीच गरिबी, अन्याय व भ्रष्टाचाराचे बळी असलेल्या जनतेच्या हितासाठी वापरली. डॉ. अनिल अवचट यांनी गरीब, मजूर, दलित, वंचित, भटक्या विमुक्त जमाती, वेश्या यांच्या प्रश्नांविषयी विपुल लेखन केले. विविध प्रश्नांवर लढा देताना आपले आयुष्य एखाद्या प्रश्नासाठी खर्च करणाऱ्या कार्यकर्त्यांविषयीही त्यांनी लेखन केले. १९६९ साली त्यांचं पहिलं पुस्तक प्रकाशित झालं त्या पुस्तकाचं नाव पूर्णिया असं होतं. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. त्यांची एकूण २२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांचे लेखन प्रेरणादायी होते. तरुण लेखकांचे ते प्रेरणास्रोत होते. तरुण लेखकांना मार्गदर्शन करण्यात ते नेहमीच पुढे असत. डॉ. अनिल अवचटांच्या लिखाणाप्रमाणेच त्यांचे सामाजिक कार्यही बहुआयामी आहे. डॉ. अनिल अवचट हे पुण्यातील मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक होते. त्यांनी आपल्या पत्नी डॉ. सुनंदा अवचट यांच्या सहकार्याने व्यसनमुक्तीची शोधलेली अनोखी पद्धत ही जगभरातील अनेक व्यसनमुक्ती केंद्रात वापरली जाते. मुक्तांगणच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरुणांना व्यसनमुक्त केले आहे. व्यसनमुक्ती क्षेत्रात त्यांचे कार्य अतुलनीय असे आहे. डॉ. अनिल अवचट हे केवळ लेखक आणि सामाजिक कार्यकर्तेच नव्हते तर एक उत्तम कलाकारही होते. त्यांची चित्रे, लाकडातील शिल्पे, छायाचित्रे, ओरिगामी, बासरी वादन यातून त्यांच्या अंगभूत गुणांची ओळख होते. सामाजिक कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. डॉ. अनिल अवचट यांची पुस्तके सलग तीन वर्ष महाराष्ट्र शासनाने सर्वोत्कृष्ट पुस्तके म्हणून जाहीर केली आहेत. अमेरिकेतील ओआया प्रांतात झालेल्या आंतरराष्ट्रीय लेखकांच्या संमेलनात त्यांच्या साहित्याचा गौरव करण्यात आला होता. सातारा येथील न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठान तर्फे दिला जाणारा सामाजिक न्याय पुरस्कार (२००७), साहित्य अकादमी तर्फे प्रथम बाल साहित्य पुरस्कार (२०१०), महाराष्ट्र राज्य पुरस्कार (२०११) तसेच त्यांच्या मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राला पुल कृतज्ञता पुरस्कार (२०१५) अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. त्यांच्या निधनाने संवेदनशील मनाचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व हरपलं असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. डॉ. अनिल अवचट यांच्या निधनाने समाजाची मोठी हानी झाली आहे. डॉ. अनिल अवचट यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार**, पुणे

### सर्वोच्च न्यायालयातर्फे पुन्हा जेल नाही बेल!!



सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा जेल नाही बेल म्हणजेच तुरुंगवास नाही जामीन या मुद्द्यांवर जोर देताना कोणत्याही व्यक्तीला राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोका आहे असे कारण देत अनिश्चित कालावधीसाठी ठेवता येणार नसल्याचे स्पष्ट केलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे न्यायालयाने कोणत्याही व्यक्तीला शक्यतेच्या आधारावर अनिश्चितच कालावधीसाठी तुरुंगात ठेवता येणार नाही असे स्पष्ट करताना यामध्ये तपास यंत्रणांकडून मोठ्या कटाची योजना या कारणाखाली पुराव्याशिवाय शक्यतांच्या आधारे एखाद्या व्यक्तीला जेलमध्ये रवानगी करता येणार नाही असे म्हटले आहे. हा निकाल न्यायमूर्ती डी. व्हाय. चंद्रचूड आणि न्या. दिनेश माहेश्वरी यांच्या खंडपीठाने सीमेपलीकडून पशू तस्करी प्रकरणी अटक करण्यात आलेल्या एका आरोपीला जमीन मंजूर करताना असा निर्णय दिला आहे आणि तो योग्यच म्हणावा लागेल. आजकाल तपास यंत्रणा कारण नसताना सबळ पुराव्याअभावी निर्दोष लोकांना जेलची वारी करण्यास भाग पाडतात. त्यामुळे अनेकांना नाहक बदनामीला सामोरे जावे लागते. भक्कम पुरावा असेल तर अटक करुन जेल करण्यास काही अडचण राहत नाही. मात्र काहीतरी कारण पुढे करुन एखाद्याला तुरुंगात डांबणे चुकीचे असल्याने सर्वोच्च न्यायालयाने घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल!!

**- राजू जाधव**, मांगूर

# भाताच्या सुधारासाठी समन्वयाची गरज



## डॉ. अजय कोहली यांचे प्रतिपादन

। खोपोली । प्रतिनिधी ।

सर्वसामान्य व्यक्तींच्या आहारात मुख्य अन्न म्हणून वापरल्या जाणाऱ्या भाताच्या सुधारासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ व आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था, फिलिपाईन्स यांच्यात समन्वयाची गरज आहे, असे प्रतिपादन जागतिक संशोधन संचालक व आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था, फिलिपाईन्सचे उपमहासंचालक डॉ. अजय कोहली यांनी येथे केले. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सह्याद्री अतिथीगृहातील सभागृहात ५६ वी महाराष्ट्र राज्य वार्षिक भात गटचर्चा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत हे होते.

व्यासपीठावर सन्माननीय अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्थेचे संशोधन आणि भागीदारीसाठी दक्षिण आशियाचे नवी दिल्ली येथे सल्लागार असलेले डॉ. उमाशंकर सिंग, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. पराग हळदणकर, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ.रमेश कुणकेरकर, सहयोगी संशोधक संचालक डॉ.शिवराम भगत व भात विशेषज्ञ डॉ.भरत वाघमोडे उपस्थित होते.

डॉ. कोहली म्हणाले की, सर्वसामान्य शेतकऱ्याचे सामाजिक व आर्थिक जीवनमान उंचावणे हे शास्त्रज्ञाचे ध्येय असले पाहिजे. ग्राहकांच्या पसंतीस उतरणाऱ्याच भात जाती शेतकरी पिकवतात असे नमूद करीत ते म्हणाले की, सामान्य व्यक्ती आपल्या आहारात ज्या भात जाती अन्न म्हणून प्रामुख्याने वापरतात त्या विकसित करण्याची गरज आहे. या कार्यक्रमाला कीटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आनंद नरंगलकर, जैवतंत्रज्ञान विभाग प्रभारी डॉ. संतोष सावर्डेकर, शिरगाव कृषी संशोधन केंद्राचे प्रभारी डॉ. विजय दळवी, पनवेल खार जमीन शास्त्रज्ञ डॉ. किशोर वैद्य, कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक डॉ. मनिष कस्तुरे तर महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठातील ३५ अधिकारी व भात शास्त्रज्ञ दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ.रवींद्र मर्दाने यांनी केले. आभार सहा. भात विशेषज्ञ डॉ. प्रवीण वनवे यांनी मानले.

# पालीवाला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शन व निर्देशानुसार पालीतील शेठ जे.एन. पालिवाला महाविद्यालयात बुधवारी (ता.२६) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या नवीन बॅचचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष सु. ए. सोसायटीचे उपाध्यक्ष रवींद्र लिमये हे होते. तर तहसीलदार दिलीप रायण्णावार, पोलीस निरीक्षक विश्वजित काईंगडे, गटविकास अधिकारी विजय यादव, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. अंजली पुराणिक हे प्रमुख अतिथी होते. यावेळी रवींद्र लिमये यांनी सांगितले की, स्पर्धा परीक्षा तयारी करतांना शेवटपर्यंत तग धरून राहिले पाहिजे. तरुणांनी आपल्या क्षमता ओळखणे आवश्यक आहे. ध्येय निश्चित करुन त्यानुसार मार्गक्रमण करणे गरजेचे आहे. तर उपजिल्हाधिकारी अरुण उंडे म्हणाले कमी वेळेमध्ये आपल्याला कसे जास्तीत जास्त साध्य करता येईल ते पहावे. या परीक्षेसाठी जिद्द चिकाटी, परिश्रम व सातत्य हवे. कोणी दबाव आणत आहे म्हणून येथे येऊ नका. लक्ष विसरून जाऊ नये असे उंडे म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा.अजित खरोसे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राचार्या डॉ.अंजली पुराणिक यांनी केले. यावेळी उपप्राचार्य एम.एस. लिमन, सुधागड तालुका स्पर्धा परीक्षा प्रमुख प्रा.संतोष भोईर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.स्नेहल बेलवलकर, प्रा.ज्ञानेश्वर मुंडे आदी उपस्थित होते.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील वर्णन केलेली मिळकत व त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. अरविंद वामन रानडे २) श्री.अमित शरद रानडे ३) श्रीमती मानसी शरद रानडे सर्व रा. थळ आगर ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीत व अखंड कसवणूकीत असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

-:मिळकतीचे वर्णन:-

| मौजे | भुमापन क्र. उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार(रु.पैसे) |
|---|---|---|---|
| डावाळे ता.अलिबाग | २३९ | ०-५९-४०<br>पो.ख. ०-०५-१०<br>एकूण ०-६४-५० | २-५० |

सदर विद्यमान मालक यांनी सदर मिळकतीची मालकी हक्काबाबत खातरजमा करण्याकरिता तसेच सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स्, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल असल्याबाबत दाखला देणेंत येईल. हे सर्वांस कळावे.

**अलिबाग**
दिनांक : २७/०१/२०२२

**ॲड.शैलेश प्रभाकर पाटील**
मु.खारगल्ली, धोबण तलावाशेजारी,
पो.नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक श्री. मधूकर कशिनाथ मसुरकर रा. सातिर्जे, अलिबाग यांचेकडुन विकत घेण्याबाबत व्यवहार निश्चित केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सातिर्जे, ता. अलिबाग येथील**

| गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| १७०/१ | ००-५३-०० | १.०० |
| गट क्र. १७०/१ मधील ००-२७-०० हे. आर. इतके क्षेत्र. | | |
| १७०/२ | ००-५१-६० | ६.३१ |
| गट क्र. १७०/२ मधील ००-०८-०० हे. आर. इतके क्षेत्र. | | |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात.

सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : २९/०१/२०२२

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
'अन्नपूर्णा' मु. पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याची ठरविलेली आहे.

मौजे-खानाव, ता.अलिबाग, येथील मिळकतीचे मालक श्री. सुरेश धाया पाटील, रा.मु.पो.कुसूंबळे, ता.अलिबाग जि.रायगड

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| खानाव ता.अलिबाग | ९१/२/अ/१ | ०-६५.८०<br>पो.ख. ०-०१-९० | ६.२० |

एकूण ०-६७-७० हे.आर. या मिळकतीपैकी सुरेश धाया पाटील यांचे मालकीचे क्षेत्र ०-१५-५० हे.आर १.४६

सदरहू वर नमूद केलेली मिळकत, वरील विद्यमान मालकाच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ वरून तसे दिसते. सदर मिळकतीत कोणचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न, वस्त्र, बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून फरोक्तखत रजिस्टर केले जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

अलिबाग
**दिनांक : २८/१/२०२२**

सही/-
**ॲड.मच्छिंद्र एस.म्हात्रे**
रा.बी./७, सोमेश्वर वैभव बिल्डींग
ब्राम्हण आळी, नाईकवाडी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९२७२१७०००९

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्री.अविनाश विठ्ठल घरत २) मेघा अविनाश घरत, रा.शेलघर, गव्हाण, ता. पनवेल, जि.रायगड यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालकांकडून विकत घेणे करीता ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:- मौजे -कडाव, तालुका-कर्जत,**
**जिल्हा-रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रु. | पै. |
| महेंद्रकुमार रामलखन पंडीत | १० | ४अ | ०.२१.५० | ० | १७ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकत बाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दि.: २८/०१/२०२२

**मनोज किसन क्षिरसागर**
(ॲडव्होकेट)
मु. सम्राट नगर,पो. नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. पिन कोड ४१०१०१

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वदप, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) छाया रमेश चंदन २) स्वप्नाली रमेश चंदन ३) समीरा रमेश चंदन ४) श्रेयश रमेश चंदन यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहेः-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ३ | २ | ०-३८-२० | ७.०६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा, कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, ॲटचमेंट वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २८/०१/२०२२

**ॲड.महेश मोतीराम घारे**
मु.सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक श्री. संतोष महादेव गावंड व श्री संदीप प्रभाकर शिरगावकर रा. सासवणे, अलिबाग यांचेकडुन विकत घेण्याबाबत व्यवहार निश्चित केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सासवणे, ता. अलिबाग येथील**

| गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| २५५ | ००-२३-४० | ६.२० |
| २७२ | ००-१२-४० | ३.०० |
| गट क्र. २७२ मधील ००-०६-२० हे. आर. इतके क्षेत्र. | | |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात.

सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे

अलिबाग
दिनांक : २९/०१/२०२२

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
'अन्नपूर्णा' मु. पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड

## कृषी उत्पन्न बाजार समिती, पेण
## पेण, जि. रायगड

**जाहिर नोटीस** फोन नं.०२१४३-२५२०६८
२५५३०३

कृषी उत्पन्न बाजार समिती पेण, या समितीचे आर्थिक वर्षे दिनांक १/४/२०२२ पासून सुरू होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण पेण तालुका आहे. बाजार समितीने नियमित केलेले धान्य, कडधान्य, तेलबिया पशुपक्षी, गुरेढोरे, शेळ्या, मेंढ्या, बकऱ्या, सर्व प्रकारचा भाजीपाला (पालेभाज्या) कांदे-बटाटे, जळाऊ लाकूड, बांबू सर्व प्रकारची फळे व फुले यासारख्या शेतीमालाच्या खरेदी विक्रीचा व्यवहार करणारे व्यापारी, कमिशन एजंट, प्रक्रिया करणारे, शेतीमालाची साठवण करणारे, स्टोरेज सुपरीटेन्डंट, हमाल, तोलाई, दलाल व त्याचे मदतनीस वगैरे संबंधित इसमांनी सन २०२२/२०२३ सालाकरीता नियम ५ अ अन्वये अनुज्ञप्तीच्या (लायसेंस) नुतणीकरणासाठी दिनांक ०१/०२/२२ ते २८/०२/२२ पर्यंत अनुज्ञप्ती नुतणीकरण फी कार्यालयीन वेळेमध्ये भरून अनुज्ञप्तीचे नुतणीकरण करून घ्यावे.

**दिनांक १/२/२०२२ ते २८/२/२०२२ या मुदतीत अनुज्ञप्तीचे नुतणीकरण न केल्यास तद्नंतर अनुज्ञप्तीच्या शेकडा १० टक्के इतका विलंब आकारणेंत येईल. तसेच नवीन लायसेंस, नुतणीकरण यावर १८ टक्के प्रमाणे जी.एस.टी.आकारला जाईल. तरी वर नमुद केल्याप्रमाणे पेण तालुक्यातील नियमित शेतीमालाचे खरेदी विक्रीचा व्यवहार करणारे स्वस्त धान्य दुकानदार व संबंधित अधिकारी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह अधिकारी व सब एजन्टस हे बाजार समितीचे लायसेंस घेणेंस पात्र ठरतील.**

समितीने नियमित केलेल्या शेतीमालाच्या खरेदी विक्रीचा व्यवहार विना अनुज्ञप्तीने (विना लायसेंस) पेण तालुका बाजार क्षेत्रात करीत असतील त्यांचेवर महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ नुसार योग्य ती पुढील कारवाई करणेंत येईल व होणारे सर्व परिणामांची व खर्चाची जबाबदारी त्यांचेवर राहील. अनुज्ञप्ती न घेणारे इसम गुन्ह्यास पात्र ठरतील.

अनुज्ञप्ती नुतनीकरणासाठी करावयाचे अर्ज व इतर माहिती कार्यालयीन वेळेंत समितीचे कार्यालयांत मिळू शकतील.

**श्री.प्रकाश मधुकर पाटील** प्र.सचिव
**श्री.भाऊ खंडू एरणकर** सभापती
कृषी उत्पन्न बाजार समिती, पेण, जि.रायगड

टिप : सर्व अनुज्ञप्ती धारकांनी आपले कडील खरेदी अहवालावरील येणे असलेली बाजार फी व देखरेखच्या रक्कमा कार्यालयांत भरणा कराव्यात. अन्यथा त्याचे लायसेंस नुतणीकरण केले जाणार नाही. याची नोंद घ्यावी तसेच अनुज्ञप्तीचे दर खालीलप्रमाणे आहेत. **तसेच नोटीस बरोबर घेऊन येणे.**

| | | | |
|---|---|---|---|
| १.अ वर्ग व्यापारी प्रक्रीया | रू. | १८० GST | १८% |
| २.मापाडी. | रु. | १८ | |
| ३.हमाल | रु. | ०४ | |

ॲड.जयप्रकाश म.मिठागरी

## जाहिर नोटीस

**माणगाव येथील दिवाणी न्यायधिश कनिष्ठ स्तर सो**
**यांचे न्यायालयात जि.रायगड**

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१०/२०२२
नि.७/ड ने.ता.०१/३/२२

१) श्रीमती मालिनी मधुकर गायकवाड
वय ५३ वर्षे, धंदा-गृहिणी
२) श्री.मंदार मधुकर गायकवाड
वय ३० वर्षे, धंदा-काही नाही
३) श्री.शेखर मधुकर गायकवाड
वय ३६ वर्षे, धंदा-मोलमजुरी
नं.१ ते ३ रा.बहिरीची वाडी, पो.भिरा
ता.माणगाव,जि.रायगड
४) सौ.मिनल संदीप खराडे .... अर्जदार
वय-३५ वर्षे धंदा-गृहिणी
रा.भिरा विठ्ठल नगर, ता.माणगाव जि.रायगड
५) सौ.सोनल नितीन दिघे
वय ३३ वर्षे, धंदा-गृहिणी,
रा.नामदेव भोईर चाळ, देवीपाडा,
गावदेवी रोड, भांडूप, (प.)मुंबई ४०००७८

विरुद्ध

कोणीही नाही .... सामनेवाला

ज्याअर्थी या जाहिर नोटीसद्वारे सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की,

१) अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडिल कै.मधुकर शिवराम गायकवाड यांचे दि.१५/०३/२०१९ रोजी आकस्मिकरित्या राहत्या घरी देहावसान झालेले आहे. अर्जदार क्र.१ ते ५ कै.मधुकर शिवराम गायकवाड यांचे हिंदू वारसा कायद्याप्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

२) कै.मधुकर शिवराम गायकवाड यांचे वारसांना वारस दाखला मिळण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज अर्जदार दाखल करीत आहे.

३) कै.मधुकर शिवराम गायकवाड हे मयत झाल्यानंतर त्यांना अर्जदार क्र.१ ते ५ हेच एकमेव हिंदू वारस कायद्याप्रमाणे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र.१ ते ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज या मे.न्यायालयात कै.मधुकर शिवराम गायकवाड यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. मयत कै.मधुकर शिवराम गायकवाड यांच्या पश्चात अर्जदार ही त्यांची कायदेशीर वारसदार आहे. अर्जदार यांच्या या वारस हक्काबद्दल कुणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी हि हरकत या अर्जाची पुढील तारीख ०१/३/२०२२ रोजी स्वतः अगर त्यांचे प्रतिनिधी वा वकिल यांचेमार्फत सकाळी १०.३० वा.मे.न्यायालयात हजर राहून नोंदवावी. अशी कोणतीही हरकत आली नाही तर अर्जदार यांना वारस दाखला देण्यांत येईल.

सदरची जाहिर नोटीस आज दिनांक २८ माहे ०१ सन २०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-**
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर
माणगाव

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, माणगाव
माणगाव- रायगड

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

प्रोसेस जमा

अर्जदार तर्फे वकील
ॲड. अभिषेक व्ही. घरत

**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. १०९/२०२१
नि. ७/ड

१) श्री. अजिंक्य प्रभाकर शिधोरे
२) श्रीम. वरदा प्रभाकर शिधोरे
३) सौ.अमृता अमेय फडके
४) सौ.श्वेता श्रीपाद साठे
} अर्जदार

**विरूद्ध**
**कोणीही नाही**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार क्रं. २ यांचे पती व अर्जदार क्रं. १, ३ व ४ यांचे वडील कै. प्रभाकर विष्णु शिधोरे हे. दि.२७/०८/२०२० रोजी मयत झाले असून त्यांस अर्जदार क्रं. १ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत.

कै. प्रभाकर विष्णु शिधोरे यांचे नाव मौ. पाली, तालुका सुधागड येथे व ग्रामपंचायत पाली हद्दीतील खालील नमूद घर मिळकती आहेत. सदर घर मिळकती अर्जदार क्रं. १ ते ४ हे वारस म्हणून त्यांचे नावावर होणे करिता त्यांनी वारस दाखला मिळावा म्हणून या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| घर क्रमांक | क्षेत्र |
|---|---|
| १९५६/१ | ३०० चौ. फू. |
| १९५६/२ | ३०० चौ. फू. |
| १९५६/३ | ३०० चौ. फू. |
| १९५६/४ | ३०० चौ. फू. |
| १९५६/५ | ४२० चौ. फू. |
| ९२ | ९५२ चौ. फू. |

तरी अर्जदारांच्या मागणी प्रमाणे त्यांना कै. प्रभाकर विष्णु शिधोरे यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटिस प्रसिद्ध झाले पासून ३० (तीस) दिवसांचे आत किंवा दि.२/३/२०२२ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे कै. प्रभाकर विष्णु शिधोरे यांचे वारस म्हणून वारस दाखला (Heirship Certificate) देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येवून मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हकूम अर्जदार यांचे लाभात करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि १८ माहे ०१/२०२२ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही
**लिपिक**
दिवाणी न्यायाधीश व स्तर, अलिबाग

कोर्टाचा शिक्का

सही
**अधिक्षक,**
दिवाणी न्यायाधीश व स्तर, अलिबाग

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-20/21-22/ Rfx No.7000022096 | E- Tender for construction of revetment & protection wall at various location of 400 kV Nagothane-Padghe (D/C) line & 400 kV Nagothane Dabhol 1 ckt in hilly area under 400 kV Line Maint. S/dn Nagothane under 400 KV RS (O & M) Division Nagothane.....**2nd call** | Limited to Rs 22,88,864/- | 04.02.22 up to 23:59 hrs. |

EMD fee 1% of estimated cost & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/**
**Contact Person :** MITESH GOYAL - Mob No. 9461456635, Email ID : **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

प्रोसेस जमा
दि.

अर्जदार तर्फे वकील
ॲड. श्री. सुभाष ह.साळुंखे
नि १२/ड

## जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठस्तर साहेब यांचे कोर्टात

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१९८०/२१

स्वाती शिवाजी परब ......अर्जदार
वगैरे २

विरूद्ध

कोणीही नाही ......सामनेवाला

अर्जदार यांचे वडिल कै.सुभाष भिकाजी उदावंत यांचे दिनांक २०/४/२०२१ रोजी आरोग्यम हॉस्पिटल डोंबिवली पूर्व येथे कोरोनो (Covid-19) मुळे निधन झाले आहे. तसेच त्याची आई कै.विजया सुभाष उदावंत यांचे दि.२५/०४/२०२१ रोजी आरोग्यम् हॉस्पिटल डोंबिवली पूर्व येथे कोरोना (Covid-19) निधन झाले आहे.

त्यांना अर्जदार १) सौ.स्वाती शिवाजी परब (२) सौ.सुप्रिया हेमंत वाफगांवकर तसेच ३) श्री. निखिल सुभाष उदावंत अशी ३ अपत्ये वारस म्हणून आहेत.

अर्जदार यांचे वडील कै.सुभाष भिकाजी उदावंत हे क्रॉम्पटन ग्रिव्हज या कंपनीतून रिटायर्ड झाले. त्यांनी नोकरीत असताना तसेच सेवानिवृत्त झाल्यावर काही भातशेती मिळकती घेतल्या होत्या तसेच शेअर घेतले होते व बँकांमध्ये रोख रक्कमा ठेवल्या होत्या. तसेच अर्जदारांच्या आई कै.विजया सुभाष उदावंत या बँक ऑफ इंडिया या बँकेतून सेवानिवृत्त झाल्या होत्या व निवृत्ती नंतर त्यांनी देखील काही बँकामध्ये रोख रक्कमा ठेवल्या होत्या. त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी अर्जदार यांच्याकडे वारस दाखल्याची मागणी केल्यामुळे अर्जदार यांनी मे.कोर्टात वारस दाखला मिळण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांचे वडील व आई यांनी खालीलप्रमाणे मिळकती घेतलेल्या व बँकेत ठेवलेल्या रक्कमांचे तपशिल खालीलप्रमाणे.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | मालकांचे नाव | मौजे | गट क्र. | क्षेत्र | आकार | किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष भिकाजी उदावंत<br>विजया सुभाष उदावंत | पळस्पे पनवेल | | ४२१ चौ फुट | | ३१,५१,११९/- |
| २. | सुभाष भिकाजी उदावंत<br>सामाईक | नेरळ ता.कर्जत कोल्हारे | ४२/२/अ जिरायत शेती योग्य | ०-२०-०० | ३.५८ | ८८,०६,०००/- |

| अ.क्र. | खातेदाराचे नाव | बँकेचे नाव | अकाऊंट नंबर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | सुभाष भिकाजी उदावंत<br>विजया सुभाष उदावंत<br>(जॉइंट अकाऊंट) | बँक ऑफ बडोदा डोंबिवली (पश्चिम) | २७८७०१००००३११ | ९,०५,३३३.७३/-<br>दि.३/९/२०२१ |
| २ | सुभाष भिकाजी उदावंत<br>विजया सुभाष उदावंत | बँक ऑफ इंडिया डोंबिवली (पूर्व) | ००९५१११०००१५२६५ | ४५,६६०९३/-<br>दि.१/८/२०२१ |
| ३ | विजया सुभाष उदावंत<br>पेन्शन खाते | बँक ऑफ इंडिया डोंबिवली (पुर्व) | ००९५१०१०००२३१३५ | ७४,१५४.७२/-<br>दि.१/८/२०२१ पर्यंत |
| ४ | विजया सुभाष उदावंत | बँक ऑफ इंडिया डोंबिवली (पूर्व) | ००९५१०१०००१५०५५ | २,११,६८७/-<br>दि.३/२/२०२१ |
| ५ | विजया सुभाष उदावंत<br>सुभाष भिकाजी उदावंत | सारस्वत बँक डोंबिवली (पश्चिम) | १२८२००१०००१६२५ | ६५,७४८.९१/-<br>दि.२९/६/२०२१ पर्यंत |
| ६ | विजया सुभाष उदावंत<br>सुभाष भिकाजी उदावंत | बँक ऑफ बडोदा डोंबिवली(पश्चिम) | २७८७०१०००००३५५ | ७२,०९८.२०/-<br>दि.१५/९/२०२१ पर्यंत |
| ७ | विजया सुभाष उदावंत | सारस्वत बँक डोंबिवली(पश्चिम) | कस्टमर नं.३१९८७२५ | १,२०,०००/-<br>दि.२३/१२/२०२१ पर्यंत |
| ८ | सुभाष भिकाजी उदावंत | शेअर्स एन.एस.डी.एल. स्टॉक एच.एल. डी.जी.कार्पोरेट ऑफ आय लिमिटेड डोंबिवली | | २८,००,३१६.६५/- |
| ९ | विजया सुभाष उदावंत | हेल्थ इन्श्योरेन्स टिपीए ऑफ इंडिया लि. | पॉलिसी नं. २५११००५०२०१००००३५२<br>पि.एफ. नं. १०६९३५<br>यु.एच.आयडी १३२००००५६५९१००१ | दि.०१/११/२०२० ते दि. ३१/१०/२०२१ |
| १० | सुभाष भिकाजी उदावंत | एक्सीस बँक डोंबिवली वेस्ट | १०८०१०१००२१३७७६ | ५३,५३५.३५ रु.<br>दि.२१/१२/२०२१ पर्यंत |

तरी अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे त्यांना कै.सुभाष भिकाजी उदावंत व कै.विजया सुभाष उदावंत यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः किंवा त्यांचे वकिलामार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांना त्यांचे मागणीप्रमाणे कै.सुभाष भिकाजी उदावंत व कै.विजया सुभाष उदावंत यांचे वारस म्हणून वारसदाखला देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येऊन मे कोर्ट आवश्यक तो वारसदाखला देण्याचा हुकूम अर्जदार यांचे लाभात करेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.२७ माहे जानेवारी २०२२ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
क.लिपीक
दिवाणी न्यायाधीश व स्तर पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पनवेल

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-11012022-232567
CG-DL-E-11012022-232567

असाधारण
EXTRAORDINARY

भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 126] नई दिल्ली, मंगलवार, जनवरी 11, 2022/पौष 21, 1943
No. 126] NEW DELHI, TUESDAY, JANUARY 11, 2022/PAUSHA 21, 1943

## सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय

## अधिसूचना

नई दिल्ली, 11 जनवरी, 2022

**का.आ. 130(अ).**—केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH753F के कि.मी. 18.6 से कि.मी.54.75 (सब डिवजनल Officer, Shriwardhan, Tal. Shriwardhan, Dist. रायगढ़ ) तक के भू-खण्ड के निर्माण (चौड़ीकरण/पेव्ड शोल्डर सहित 2-लेन/4-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (1) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात् सब डिवजनल अफसर श्रीवर्धन को लिखित रूप में प्रस्तुत की जाएगी और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

## अनुसूची

महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH753F के कि.मी. 18.6 से कि.मी.54.75 (सब डिवजनल Officer, Shriwardhan, Tal. Shriwardhan, Dist. रायगढ़ ) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण

| राज्य का नाम: महाराष्ट्र | जिले का नाम: रायगड | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **क्रमिक संख्या** | **सर्वेक्षण संख्या** | **भूमि का प्रकार** | **भूमि की प्रकृति** | **भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई)** | **भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर)** |
| **तालुक का नाम: महासला** | | | | | |
| **गांव का नाम: खारगाव खूर्द** | | | | | |
| 1 | 14/1/A/9 | निजी | कृषक | 0.1659000(हेक्टेयर ) | 0.1659000 |
| 2 | 14/1A/1 | निजी | कृषक | 0.6182000(हेक्टेयर ) | 0.6182000 |
| 3 | 2/1A/1/1A | निजी | कृषक | 0.0398000(हेक्टेयर ) | 0.0398000 |
| 4 | 40/1A/2 | निजी | कृषक | 0.0150000(हेक्टेयर ) | 0.0150000 |
| 5 | 40/1A/3 | निजी | अकृषक | 0.1000000(हेक्टेयर ) | 0.1000000 |
| 6 | 40/1A/4 | निजी | कृषक | 0.0226000(हेक्टेयर ) | 0.0226000 |
| 7 | 40/1B/6 | निजी | कृषक | 0.0172000(हेक्टेयर ) | 0.0172000 |
| **गांव का नाम: म्हसळा** | | | | | |
| 1 | 34/4A | निजी | कृषक | 0.0845000(हेक्टेयर ) | 0.0845000 |
| 2 | 34/7 | निजी | कृषक | 0.1445000(हेक्टेयर ) | 0.1445000 |
| 3 | 35/1A | निजी | अकृषक | 0.0267000(हेक्टेयर ) | 0.0267000 |
| 4 | 35/3B | निजी | कृषक | 0.0686000(हेक्टेयर ) | 0.0686000 |
| 5 | 35/8C | निजी | कृषक | 0.0366000(हेक्टेयर ) | 0.0366000 |
| 6 | Kond Gavthan Number 4-(11) | निजी | अकृषक | 0.0080000(हेक्टेयर ) | 0.0080000 |
| 7 | Kond Gavthan Number 4-(12) | निजी | अकृषक | 0.0050000(हेक्टेयर ) | 0.0050000 |
| 8 | Kond Gavthan Number 4-(13) | निजी | अकृषक | 0.0070000(हेक्टेयर ) | 0.0070000 |
| **गांव का नाम: तोंडसुरे** | | | | | |
| 1 | 1 | निजी | कृषक | 0.1758000(हेक्टेयर ) | 0.1758000 |
| 2 | 2 | निजी | कृषक | 0.1827000(हेक्टेयर ) | 0.1827000 |
| 3 | 28 | निजी | कृषक | 0.0487000(हेक्टेयर ) | 0.0487000 |
| 4 | 3 | निजी(नीजी) | कृषक | 0.0180000(हेक्टेयर ) | 0.0180000 |
| 5 | 30 | निजी | कृषक | 0.0053000(हेक्टेयर ) | 0.0053000 |
| 6 | 31 | निजी | अकृषक | 0.0091000(हेक्टेयर ) | 0.0091000 |
| 7 | 55 | निजी | कृषक | 0.0109000(हेक्टेयर ) | 0.0109000 |
| 8 | 60 | निजी | कृषक | 0.0711000(हेक्टेयर ) | 0.0711000 |
| **तालुक का नाम: श्रीवर्धन** | | | | | |
| **गांव का नाम: दिघी** | | | | | |
| 1 | 209/A | निजी | कृषक | 0.0359000(हेक्टेयर ) | 0.0359000 |
| 2 | 210/A | निजी | कृषक | 0.0161000(हेक्टेयर ) | 0.0161000 |
| 3 | 212/A | निजी | कृषक | 0.0114000(हेक्टेयर ) | 0.0114000 |
| **गांव का नाम: करलास** | | | | | |
| 1 | 84 | निजी | कृषक | 0.0085000(हेक्टेयर ) | 0.0085000 |
| **गांव का नाम: वडवली** | | | | | |
| 1 | 613 | निजी | कृषक | 0.0311000(हेक्टेयर ) | 0.0311000 |
| | | | कुल | **1.9842** | **1.9842** |

[फा. सं. 12037/38/2017-MAH(P-6)/3A]

राजेश गुप्ता, निदेशक

## MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS

## NOTIFICATION

New Delhi, the 11th January, 2022

**S.O. 130(E).** In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for building (widening/two lane with paved shoulder/four laning etc.,), maintenance, management and operation of NH753F in the stretch of land from Km 18.6 to Km54.75 (Sub Divisional Officer, Shriwardhan, Tal. Shriwardhan, Dist. Raigad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, object to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Sub Divisional Officer Shriwardhan in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

## SCHEDULE

Brief Description of the land to be acquired with or without structures falling NH753F in the stretch of land from Km. 18.6 to Km. 54.75 (Sub Divisional Officer, Shriwardhan, Tal. Shriwardhan, Dist. Raigad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA

| State: MAHARASHTRA | District: RAIGAD | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sl. No.** | **Survey / Plot Number** | **Type of Land** | **Nature Of Land** | **Area (in Local Unit)** | **Area (in Hectare)** |
| **Taluk: Mhasla** | | | | | |
| **Village: Khargaon Khu** | | | | | |
| 1 | 14/1/A/9 | Private | Agriculture | 0.1659000(Hectare ) | 0.1659000 |
| 2 | 14/1A/1 | Private | Agriculture | 0.6182000(Hectare ) | 0.6182000 |

(पान ७ वर)

(पान ६ वरुन)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 2/1A/1/1A | Private | Agriculture | 0.0398000(Hectare ) | 0.0398000 |
| 4 | 40/1A/2 | Private | Agriculture | 0.0150000(Hectare ) | 0.0150000 |
| 5 | 40/1A/3 | Private | Non Agriculture | 0.1000000(Hectare ) | 0.1000000 |
| 6 | 40/1A/4 | Private | Agriculture | 0.0226000(Hectare ) | 0.0226000 |
| 7 | 40/1B/6 | Private | Agriculture | 0.0172000(Hectare ) | 0.0172000 |
| Village: Mhasala | | | | | |
| 1 | 34/4A | Private | Agriculture | 0.0845000(Hectare ) | 0.0845000 |
| 2 | 34/7 | Private | Agriculture | 0.1445000(Hectare ) | 0.1445000 |
| 3 | 35/1A | Private | Non Agriculture | 0.0267000(Hectare ) | 0.0267000 |
| 4 | 35/3B | Private | Agriculture | 0.0686000(Hectare ) | 0.0686000 |
| 5 | 35/8C | Private | Agriculture | 0.0366000(Hectare ) | 0.0366000 |
| 6 | Kond Gavthan Number 4-(11) | Private | Non Agriculture | 0.0080000(Hectare ) | 0.0080000 |
| 7 | Kond Gavthan Number 4-(12) | Private | Non Agriculture | 0.0050000(Hectare ) | 0.0050000 |
| 8 | Kond Gavthan Number 4-(13) | Private | Non Agriculture | 0.0070000(Hectare ) | 0.0070000 |
| Village: Tondsure | | | | | |
| 1 | 1 | Private | Agriculture | 0.1758000(Hectare ) | 0.1758000 |
| 2 | 2 | Private | Agriculture | 0.1827000(Hectare ) | 0.1827000 |
| 3 | 28 | Private | Agriculture | 0.0487000(Hectare ) | 0.0487000 |
| 4 | 3 | Private | Agriculture | 0.0180000(Hectare ) | 0.0180000 |
| 5 | 30 | Private | Agriculture | 0.0053000(Hectare ) | 0.0053000 |
| 6 | 31 | Private | Non Agriculture | 0.0091000(Hectare ) | 0.0091000 |
| 7 | 55 | Private | Agriculture | 0.0109000(Hectare ) | 0.0109000 |
| 8 | 60 | Private | Agriculture | 0.0711000(Hectare ) | 0.0711000 |
| Taluk: Shrivardhan | | | | | |
| Village: Dighi | | | | | |
| 1 | 209/A | Private | Agriculture | 0.0359000(Hectare ) | 0.0359000 |
| 2 | 210/A | Private | Agriculture | 0.0161000(Hectare ) | 0.0161000 |
| 3 | 212/A | Private | Agriculture | 0.0114000(Hectare ) | 0.0114000 |
| Village: Karlas | | | | | |
| 1 | 84 | Private | Agriculture | 0.0085000(Hectare ) | 0.0085000 |
| Village: Vadavli | | | | | |
| 1 | 613 | Private | Agriculture | 0.0311000(Hectare ) | 0.0311000 |
| | | | Total | 1.9842 | 1.9842 |

[F. No. 12037/38/2017-MAH(P-6)/3A]

RAJESH GUPTA, Director

जिमाका/राअ/जाहिरात/२१७/२०२१-२२

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग

ईमेल पत्ताः thane2.ee@mahapwd.gov.in    दुरध्वनी/फॅक्स क्रमांकः-०२२-२५३६१३९३

### निविदा सुचना क्र.०४ (ऑफलाईन) सन २०२१-२२

कार्यकारीअभियंता, सा.बां.विभाग क्र.२, ठाणे जिल्हा ठाणे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गातील फक्त नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन) पद्धतीने मागवित आहेत. कोऱ्या निविदाचा नमुना कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग क्र.२, ठाणे यांचेकडून दिनांक ०१/०२/२०२२ पासून दिनांक ०८/०२/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत देण्यात येतील. कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग क्र.२, ठाणे हे भरून पाठविलेल्या निविदा दिनांक १०/२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्विकारतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडतील.

कामाचे नांवः-१) मुरबाड तालुक्यातील देवगांव येथे अंतर्गत रस्त्यावर पेव्हरब्लॉक बसविणे. (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम).अंदाजित किंमतः-रु.२,५३,८१६/-
२) मुरबाड तुालक्यातील कोळठण ग्रामपंचायत हद्दीतील ठाकरेपाडा येथे अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः-रु.२,५५,८३७/-
३) मुरबाड तालुक्यातील भालुक येथे अंतर्गत रस्त्यावर पेव्हरब्लॉक बसविणे. (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः- रु.२,५५,७८८/-
४) उल्हासनगर तालुक्यातील शासकीय तंत्रनिकेतन उल्हासनगर-३ येथे मुख्य इमारतीपासून सायकल स्टॅण्डपर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे. अंदाजित किंमतः- रु.२,५६,१८४/-
५) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शहापूर येथील पुरूष व स्त्री प्रसाधन गृहाची दुरूस्तीव नुतनीकरण करणे. अंदाजित किंमत रु.२,५९,०८८/-
६) शहापूर तालुक्यातील मौजे विहिगांव अशोका धबधबा परिसरातील वैतरणा घाट येथे गजीबाचे बांधकाम करणे. (पर्यटन विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः-रु. ४,१६,८२८/-
७) शासनाच्या प्लॉट नं.३१५ सी.सी.सर्व्हे नं.४२०६ भूखंडावर दगडी बांधकाम व तारेचे कंपाऊंड बांधणे. (सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना) अंदाजित किंमत रु.४,२६,८७५/-
८) मुरबाड तालुक्यातील बराडपाडा येथे अंतर्गत रस्त्यावर पेव्हरब्लॉक बसविणे. (डोंगरी विभाग विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः- रु. ४,३०,१३६/-
९) उल्हासनगर तालुक्यातील उल्हासनगर-३ येथील स्मशानभूमी विकसित करणे. अंदाजित किंमतः-६,९९,५९४/-
१०) आंबरनाथ तालुक्यातील उल्हासनगर-३ येथील स्मशानभूमी येथे सिमेंट कॉंक्रिट रस्ता तयार करणे. (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः- रु. ७,७२,३०४/-
११) उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र.७ रमाबाई आंबेडकर नगर आईस फॅक्टरीसमोर आर्ट गॅलरी बनविणे. (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः- रु.८,५०,९६३/-
१२) उल्हासनगर तालुक्यातील वडोलगांव उल्हासनगर-३ रस्ता तयार करणे (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः- रु.८,५९,३४८/-
१३) शहापूर तालुक्यातील मौजे विहिगांव अशोका धबधबा परिसरातील वैतरणा घाट येथे कमानीचे बांधकाम करणे. (पर्यटन विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः- रु. ८,६३,५८४/-
१४) शहापूर तालुक्याील मौजे विहिगांव अशोका धबधबा परिसरातील वैतरणा घाट येथे बैठक व्यवस्था करणे. (पर्यटन विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः- रु.८,०६,९९४/-
१५) शहापूर तालुक्यातील बाबघर (बाबघर समाज मंदिर ते शंकर काशिनाथ तिवरे) यांच्या घराकडे जाणारा अंतर्गत रस्ता तयार करणे. (डोंगरी विकास कार्यक्रम), अंदाजित किंमतः- रु.६,३३,२५०/-
१६) शहापूर तालुक्यातील मौजे मळेगांव येथे गणपती मंदीराशेजारी समाजमंदिर बांधणे. (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः-रु.८,५९,०७०/-
१७) मुरबाड तालुक्यातील असोले नवबौद्ध वस्ती येथे रस्ता तयार करणे. (सामाजिक विकास कार्यक्रम) अंदाजित किंमतः-८,५९,८४५/-

१) कोरे निविदा पत्रके पोस्टाने पाठविण्यात येणार नाही व कोणत्याही कारणस्तव काम रद्द झाल्यास कोरे निविदा पत्राची भरलेली रक्कम परत केली जाणार नाही.
२) भागीदारी फर्म असेल तर निविदेसोबत भागीदारी कराराची साक्षंकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील.
३) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग क्र.२ ठाणे यांचे कार्यालयातील सुचना फलकावर सदरची निविदा सुचना पहावयास मिळेल.
४) कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
५) कंत्राटदाराने कोऱ्या निविदा संच विकत घेण्यापूर्वी अर्जासोबत मुळ नोंदणी प्रमाणपत्र/साक्षांकित नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

जा.क्र.साबंविक्र.२/ठाणे/निविदा/२०२१-२२/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां.विभाग क्र.२, ठाणे,
सा.बा.आवार स्टेशन रोड, ठाणे-४००६०१.
दिनांकः-   /  /२०२२

**कार्यकारी अभियंता**
सां.बा.विभाग क्र.२, ठाणे

विमाका/कोवि/२०२१-२०२२/२८९

# ‘एअर इंडिया’ पुन्हा टाटा समूहाकडे

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सुमारे सात दशकांनंतर ‘महाराजा’ची टाटा समूहाकडे घरवापसी झाली. ‘एअर इंडिया’ची मालकी गुरुवारी पुन्हा मिळवताच टाटा समूहाने या कंपनीला गतवैभव प्राप्त करून देण्याचा निर्धार व्यक्त केला.

‘एअर इंडिया’च्या खरेदीसाठी स्पाईस जेटच्या प्रवर्तकांनी १२,९०६ कोटी रुपयांची बोली लावली होती. मात्र, सर्व मालमत्ता आणि कंपनीवर असलेल्या सुमारे १५ हजार ३०० कोटींच्या कर्जासह ‘टाटा सन्स’ने लावलेली १८ हजार कोटी रुपयांची बोली जिंकली. त्यातील २७०० कोटी रुपये रोख स्वरूपात देण्याचे ठरले होते. त्यानुसार ही रक्कम प्राप्त झाली असून, ‘एअर इंडिया’चा निर्गुंतवणूक व्यवहार पूर्ण झाल्याचे अर्थमंत्रालयाने निवेदनाद्वारे स्पष्ट केले. ‘एअर इंडिया’च्या हस्तांतरणाबाबत ‘टाटा सन्स’चे अध्यक्ष एन.चंद्रशेखरन यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. त्यानंतर चंद्रशेखरन यांनी ‘एअर इंडिया’च्या कार्यालयात जाऊन हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण केली आणि नव्या संचालक मंडळाची बैठक पार पडली.

### राज्य शरीरसौष्ठव अजिंक्यपद स्पर्धा
# रायगड जिल्ह्याची भरीव कामगिरी

**। अलिबाग । वार्ताहर ।**

औरंगाबाद येथे ७१ वी हौशी राज्यस्तरीय विविध प्रकारच्या शरीर सौष्ठव अजिंक्यपद स्पर्धा कोरोना गाईडलाईन्सचे काटेकोरपणे पालन करत संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्याचा १५ स्पर्धकांचा चमू तरला होता. त्यापैकी ८ स्पर्धकांनी पहिल्या ६ क्रमांकावर बाजी मारली. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



यावेळी संघटनेचे सचिव संतोष साखरे यांनी काही स्पर्धेचे पंच परिक्षण केले, तर काही स्पर्धांचे सुत्रसंचालन केले. सुनील राणे यांनी टीम मॅनेजर तर विक्रांत पाटील यांनी व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळली.

या स्पर्धेत ठाण्यातील अजय पाटील यांनी महाराष्ट्र श्री २०२२ हा किताब पटकावला. तर रायगड जिल्ह्यातील अजित वामन म्हात्रे महाराष्ट्र उदय गट २ मध्ये प्रथम क्रमांक, जितेंद्र गणनाथ पाटील महाराष्ट्र श्रीमान गट ४ मध्ये दुसरा क्रमांक, अनंता शांताराम भोईर महाराष्ट्र श्रीमान गट २ मध्ये तिसरा क्रमांक, विकास नरहरी पाटील महाराष्ट्र श्रीमान गट ३ मध्ये पाचवा क्रमांक, दिवेश हरिश्चंद्र कळबटे महाराष्ट्र कुमार गट १ मध्ये दुसरा क्रमांक, संकेत संजय वर्तक महाराष्ट्र कुमार गट ३ मध्ये दुसरा क्रमांक, अनिकेत जनार्दन पाटील महाराष्ट्र मेन फिजिक गट २ चौथा क्रमांक, मनीषा अरविंद कालवणकर महाराष्ट्र वुमेन फिटनेस सहावा क्रमांक अशी स्पर्धकांनी बाजी मारली. या स्पर्धेमध्ये वुमेन फिटनेस, वुमेन बॉडी बिल्डिंग या स्पर्धा पहिल्यांदाच आयोजित केल्या होत्या आणि या स्पर्धा प्रमुख आकर्षण ठरल्या.

# हरिहरेश्वर येथे पोलीस चौकीचे उद्घाटन

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर येथील पोलीस चौकीचे नुतनीकरण करण्यात आले.

निसर्ग चक्रीवादळात हरिहरेश्वर पोलीस चौकीचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. यामुळे येथील पोलीस कर्मचाऱ्यांची गैरसोय होत होती. सदर चौकीच्या दुरुस्तीसाठी सरपंच अमित खोत, ग्रामपंचायत हरिहरेश्वर सदस्य व सामाजिक सर्व कार्यकर्ते यांनी एक पाऊल पुढे टाकत सदर चौकीची दुरुस्ती केली.

या कार्यक्रमा प्रसंगी श्रीवर्धनचे डिवायएसपी स्वामी, बाबर, श्रीवर्धन पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी वर्ग, हरिहरेश्वर सरपंच अमित खोत, उपसरपंच विजय पाटील, सुबोध खोपटकर, सचिन गुरव, माजी उपसरपंच सुयोग लांगी, पोलीस पाटील, विनोद भोसले व नागरिक उपस्थित होते.



# थंडीमुळे हृदयविकार, श्वसनविकारात वाढ



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

गेल्या चाळीस वर्षांचा विक्रम मोडत थंडीने यावर्षी नवीन विक्रम केला असून, हृदयविकार असलेल्या रुग्णांसाठी थंडी तापदायक झाली आहे. त्यामुळे हृदयविकाराच्या पेशंटने थंडीत पहाटे व्यायाम अथवा शारीरिक हालचाली करू नये, असा सल्ला हृदयविकार तज्ज्ञांनी दिला आहे.

याविषयी अधिक माहिती देताना नेरुळ येथील शुश्रूषा हार्ट केयर व स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक व हृदयशल्यविशारद डॉ. संजय तारळेकर म्हणाले, हृदयविकाराच्या पेशंटने थंडीत पहाटे व्यायाम अथवा शारीरिक हालचाली करू नये, कारण पूर्वीपासून हृदयविकाराचा त्रास असलेल्या अनेकांना त्याचा फटका बसण्याची शक्यता अधिक असते. थंडी आणि हृदयविकाराचा झटका यांचा परस्परसंबंध आहे. थंडीत शरीरातील हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. हृदयविकारासोबतच श्वसनविकारात सुद्धा वाढ झाली असल्याचे निरीक्षण तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेंटरतर्फे करण्यात आले आहे. याविषयी अधिक माहिती देताना तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेंटरचे फुफ्फुसरोगतज्ज्ञ डॉ. अभय उप्पे म्हणाले, मुंबई व लगतच्या उपनगरांत नागरिकांना ३० ते ३५ डिग्री तापमानाची सवय असणाऱ्या नागरिकांना अचानक हवेतील बदलांमुळे त्रास होत आहे. सध्या मुंबई आणि नवी मुंबई परिसरात मोठ्या प्रमाणावर धुरक्याचे साम्राज्य पसरले आहे. या धुरक्यामध्ये वाहनांचा धूर मिसळत असल्याने ‘क्रोनिक ऑब्स्ट्रॅक्टिव्ह पल्मनरी डिसीज’ (सीओपीडी) अर्थात काळ्या दम्याच्या श्वसनविकाराच्या गंभीर आजाराचा विळखा गर्भवती महिलांभोवती पडत आहे. गर्भवती मातांमध्ये रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्यामुळे त्यांना थंडीमध्ये वारंवार सर्दी, पडसे, खोकला, ताप व कीटकांपासून होणाऱ्या आजारांची लागण लगेच होऊ शकते.

# पालीत नगराध्यक्षपदासाठी सर्वसाधारण खुले आरक्षण

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

पाली नगरपंचायत पाली नगरपंचायत नगराध्यक्षपदासाठी सर्वसाधारण खुले आरक्षण पडले आहे. त्यामुळे आघाडीच्या कार्यकर्त्यांनी पालीत फटाके फोडून व घोषणा देत एकच जल्लोष केला.



प्रतिष्ठेच्या पाली नगरपंचायतीचा पहिला नगराध्यक्ष होण्याचा मान राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या रायगड जिल्हा महिला अध्यक्षा गीता पालरेचा यांना मिळणार आहे. आघाडीच्या कार्यकर्त्यांची स्वप्नपूर्ती झाली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे व शेकापच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पाली शहर अध्यक्ष अभिजित चांदोरकर, तालुका अध्यक्ष रमेश साळुंखे, तालुका युवक अध्यक्ष संदेश शेवाळे, नगरसेवक सुलतान बेनसेकर, अंकिता मोरे, सुधाकर मोरे, परेश वडके, शेखर राऊत व डॉ. जयंत जाधव आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जेएनपीटीकडून ५.६३ दशलक्ष टीईयूची विक्रमी माल हाताळणी

**। उरण । वार्ताहर ।**

भारतातील प्रमुख कंटेनर पोर्ट असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) ची माल हाताळणीत सातत्यपूर्ण वाढ २०२१ मध्ये सुद्धा सुरूच आहे. २०२१ मध्ये जेएनपीटी बंदरात एकूण ५.६३ दशलक्ष टीईयू (५,६३१,९४९ टीईयू) कंटेनर वाहतूक हाताळणी झाली, जी २0२0 च्या (४.७ दशलक्ष टीईयू) तुलनेत २५.८६ टक्के अधिक आहे.

२०२१ मध्ये जेएनपीटी बंदरात एकूण ७६.१४ दशलक्ष टन वाहतूक हाताळणी झाली, ज्यामध्ये ५.६३ दशलक्ष टीईयू कंटेनर वाहतूक होती. जेएनपीटीची ही आजवरची एका वर्षात हाताळलेली सर्वाधिक वाहतूक आहे. विशेष म्हणजे, भारतातील कोणत्याही बंदराद्वारे केली गेलेली आयात-निर्यात कंटेनरची ही आजवरची सर्वाधिक वाहतूक हाताळणी आहे. एनएसआईजीटी व बीएमसीटीनेने प्रथमच एका वर्षात १ दशलक्ष टीईयूपेक्षा अधिक अर्थात क्रमशः १.१७ दशलक्ष टीईयू (१,१६६,०१९) व १.१७ दशलक्ष टीईयू (१,१७०,५०२) हाताळणी केली आहे.

यावर्षी, जेएनपीटीने किनारपट्टीवरील मालवाहतुकीस चालना देण्यासाठी मसागरमालाफ कार्यक्रमांतर्गत एक नवीन समर्पित कोस्टल बर्थ तयार केला आहे. या धक्क्यावर नुकतेच प्रायोगिक तत्वावर माल हाताळणी सुद्धा सुरू केली आहे. जेएनपीटीमध्ये एक अत्याधुनिक सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझा (सीपीपी)सुरू करण्यात आले असून सीपीपीच्या ऑपरेशन्सचा लाइव डेटा यूजर्सना उपलब्ध व्हावा यासाठी एक मोबाइल ॲप-जेएनपी -सीपीपी व ई-वॉलेट लॉंच करण्यात आले आहे. तसेच फॅक्टरी सीलबंद निर्यात कनटेनर्ससाठी कस्टम तपासणी सुविधा तयार करण्यासाठी भूमिपुजन करण्यात आले आहे. आयात-निर्यात कार्गोची रेल्वे वाहतूक सुव्यवस्थित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, जेएनपीटीने डबल-स्टॅक्ड ड्वार्फ कंटेनर्सच्या माध्यमातून ड्वार्फ कंटेनर ट्रेन सेवा सुरू केली आहे. ही सुविधा सुरू करून जेएनपीटीने एकाच वेळी रेल्वे-कार्गो वाहतूकीमध्ये वाढ करून आयात-निर्यात समुदायास देशांतर्गत वाहतूक खर्च कमी करून स्पर्धात्मक खर्चाचा लाभ करून दिला.

देशाच्या व्यापारास चालना देण्याच्या उद्देशाने, जेएनपीटीमध्ये जागतिक मानकांनुसार बंदराची कार्यक्षमता आणि दक्षता सतत विकसित करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न सुनिश्चित केले जातात.



# १२ आमदारांचे निलंबन रद्द झाल्याने चिपळुणमध्ये जल्लोष

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

भारतीय जनता पार्टी चिपळूणच्या वतीने विधान सभेतील जे १२ आमदार निलंबित केले होते, त्यांच्या बाजूने सुप्रीम कोर्टाने निकाल दिला आहे. आमदारांचे निलंबन रद्द झाले म्हणून फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष आशिष खातू, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संतोष मालप, जिल्हा सदस्य रत्नदीप देवळेकर, राम शिंदे, जतीन घटे, विनायक वरवडेकर, निखिल किल्लेकर, प्रभंजन पिंपूटकर, मंदार कदम, स्वानंद रानडे, प्रीतम इंगवले, भालचंद्र बापट, दिलीप सकपाळ आदी हजर होते.

# कलासक्त



## आठवण

वसंत चौलकर



# कीर्तीवंत स्वरसम्राज्ञी कीर्ती शिलेदार

**संगीत रंगभूमीवरील जयराम आणि जयमाला शिलेदार यांची कन्या असलेल्या कीर्ती शिलेदार यांनी मराठी रंगभूमीसाठी बहुमूल्य योगदान दिले. वयाच्या दहाव्या वर्षी कीर्ती शिलेदार यांनी 'सौभद्र' नाटकातून रंगभूमीवर पाऊल ठेवले. त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण नीलकंठबुवा अभ्यंकर यांचेकडे घेतले. शिलेदार यांनी विविध नाटकांचे चार हजारांहून अधिक प्रयोग केले. संगीत कान्होपात्रासह जुन्या नाटकातल्या गाण्यांचा गोडवा त्यांनी नव्या पिढीपर्यंत पोहोचवला. 'संगीत स्वरसम्राज्ञी' हे त्यांचे नाटक गाजले. संगीत रंगभूमीच्या पडत्या काळात त्यांनी मोलाची कामगिरी बजावली.२०१८ मध्ये मुंबईत पार पडलेल्या ९८ व्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद कीर्ती शिलेदार यांनी भूषविले होते. राज्य सरकारच्या अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कारासह, संगीत नाटक अकादमीचा विशेष पुरस्कार राज्य पुरस्कार पुरस्कृत 'बालगंधर्व' पुरस्कार, नाट्य 'दर्पण रजनी'चा नाट्यव्रती सन्मान, पुणे महापालिकेचा 'बालगंधर्व' पुरस्कार आदी विविध पुरस्कारांनी त्यांचा गौरव झाला. संगीत नाटकाला ध्यास व श्वास मानून सहा दशके अव्याहतपणे रंगभूमीची सेवा केलेल्या ज्येष्ठ गायिका अभिनेत्री विदुषी कीर्ती शिलेदार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ६९ व्या वर्षी निधन झाले. त्यांना अर्पण केलेली ही श्रद्धांजली.**

संगीत हिच मातृभाषा असलेल्या स्वरसम्राज्ञी कीर्ती शिलेदार यांचं संगीत आणि संगीत नाटकाबरोबरचे नात जन्माआधीपासूनच जुळून गेलेले आहे. त्या आईच्या पोटात होत्या तेव्हा त्यांची आई विश्रांतीसाठी नाना म्हणजे त्यांचे वडील जयराम शिलेदार यांच्याबरोबर भारत नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी गेली होती. मंडळींचा सावंतवाडीला दोन महिने मुक्काम होता. त्याच दरम्यान नाटकातील प्रमुख नायिका अचानक कोर्टाच्या कामानिमित्त पुण्याला गेली होती. तिला येण्यास उशीर झाल्याने लोकाग्रहास्तव त्यावेळी 'सौभद्र' नाटकातील सुभ्रदेची भूमिका कीर्तीच्या आईला करावी लागली होती.

घरातच संगीत, नाटक असल्यानं कीर्तीला लहान वयातच बाळकडू मिळालं होतं, त्यामुळेच खऱ्या अर्थानं कीर्तीचं रंगमंचावर पहिले पाऊल पडलं ते वयाच्या दहाव्या वर्षी 'सौभद्र' मधील नारदाच्या प्रमुख भूमिकेत त्यानंतर थोड्याच काळात 'सौभद्र'चा पूर्ण प्रयोग बहिण लता, चुलतभाऊ सुरेश आणि कीर्ती अशा तीन शिलेदारांनी साकारला. त्यावेळी बिऱ्हाडी स्वरुपाची 'मराठी' रंगभूमी ही संस्था १९५८ साली बंद झाल्याने व मुलींच्या शिक्षणाचा विचार करुन जयराम व जयमाला शिलेदार पुण्यात स्थायिक झाले. तत्कालीन परिस्थितीत मराठी रंगभूमीचं काम नाईट पद्धतीन सुरु झालं. जयराम व जयमाला शिलेदार पुण्यात स्थायिक झाले. तत्कालिन परिस्थितीत मराठी रंगभूमीच काम नाईट पद्धतीन सुरु झालं. जयराम व जयमाला यांची नाटक बघता-बघता संवाद आणि पद त्यांच्या मुलींना (लता आणि कीर्ती पाठ होऊन जात मुलींचं नाटकांबद्दलचे कौशल्य व विशेष गुण पाहून, त्यांच्यातील कलागुणांना आकार देण्यासाठी नानांनी (जयराम) लता व कीर्तीच्या समोर सौभद्र नाटकाचं आव्हान ठेवलं. लताचा गळा चांगला फिर असल्यानं महत्त्वाच्या भूमिका तीला दिल्या. पण कीर्तीचा गळा तान अजिबात फिरत नसे! पण सुरताल ठिकठाक असल्याने जयमाला बाई आवाजाच्या नैसर्गिक धाटणीला धक्का न लावता पदं बसवून घेत असत.

'रंगात रंगला श्रीरंग', 'ययाती आणि देवयानी' अशा नाटकांतून उमेदवारी करीत असताना 'कीर्तीला स्वयंवर' नाटकातल्या रुक्मिणीचं आकर्षण वाटत असे, अनेक विद्यार्थीनींना जयमाला बाई नाट्यसंगीत शिकवत असताना स्वयंवर मधली गाणी बसून गेल्याने नानांजवळ कीर्तीने रुक्मिणीच्या भूमिकेचा हट्ट केला. नानांच्या आग्रहास्तव कीर्तीने 'स्वयंवर' मधली सर्व पदे तालासुरात म्हणून दाखवली. नानांना विश्वास वाटला. गद्य भाग बसवण्यासाठी कीर्तीला वसईला दत्तराम बापूंचं मार्गदर्शन घेण्यासाठी पाठवण्यात आलं. तेथे तिने रुक्मिणीची भूमिका समजावून घेतली. प्रत्यक्ष नाटकात जयमाला बाईंनी साकारलेल्या रुक्मिणीपेक्षा कीर्तीची रुक्मिणी वेगळी होत होती. तीच्या नानांना, आईला तेच अपेक्षित होत. प्रत्येक भूमिकेचा वेगळा अभ्यास करायला त्यांनी पहिल्यापासून प्रोत्साहन दिले होते. 'स्वयंवर' मधील पदं म्हणताना कीर्तीला खूप आनंद वाटे. पद साकारताना तीने एक वेगळी शैली तयार केली होती. पद अभिव्यक्त करण्याची तीची नवी कल्पना रसिकांनी उचलून धरली. त्यावेळी सादर होणाऱ्या संगीत नाटकातील बरेचसे कलाकार नाटकातून पद गाताना गायकीवर अधिक लक्ष केंद्रित करत असत. कैकदा भूमिकेतून अलिप्त होऊन ही गायकी प्रकट होत असे, अर्थात त्यावेळचा रसिकवर्ग नाट्यवेडा पेक्षा संगीत वेडा अधिक होता.



त्यामुळे ती संगीत नाटकही लोकप्रियेत कुठही कमी नव्हती. रुक्मिणीच्या भूमिकेत कीर्ती, कृष्णाच्या भूमिकेत विश्वनाथ बागूल, भीष्मक महाराणीच्या भूमिकेत जयराम आणि जयमाला शिलेदार! अशा यथोचित पात्र योजनेमुळे, नाविन्यामुळे ताजेपणाच्या स्पर्शाने 'स्वयंवर टवटवीत झालं आणि रसिकांच्या पसंतीला उतरलं.

बारा जुन्या संगीत नाटकांबरोबरच शिलेदारांच्या 'मराठी' रंगभूमीने पंचवीस नवी संगीत नाटकं रंगभूमीवर आणली. जुन्या नाटकांइतकी लोकप्रियता नव्या संगीत नाटकांना सहजासहजी लाभत नाही, खूप अपयश पचवण्यावर 'स्वरसम्राज्ञी' सारखं एक यशं परमेश्वरानं शिलेदारांच्या पदरात टाकलं. १९७२ साली विद्याधर गोखलेंनी 'पिग्मॅलियन', 'माय फेअर लेडी'च्या विषयांवर आधारीत 'स्वरसम्राज्ञी' नाटक लिहिलं. भारतीय वातावरणात ते कथानक जुळवून घेताना नायिकेचा सुरवंटातून फुलपाखरु बनण्याचा प्रवास भाषेपेक्षा संगीतामध्ये जास्त खुलत होता हे लक्षात घेऊन त्यांनी, 'नायक गंगाधर एका तमाशातील लावणी गायिकेला शास्त्रीय संगीताची गायिका बनविण्याचे स्वप्न सत्यात आणतो.' असा आराखडा रेखला. या नाटकांमुळे पं. नीलकंठ अभ्यंकरांसारख्या महान संगीतकारांबरोबर कीर्तीची ओळख झाली. तेव्हापासून लता आणि कीर्ती बुवांकडे शास्त्रीय संगीत शिकू लागल्या. 'स्वरसम्राज्ञी' नाटकाच्या निमित्ताने बुवांनी खूप काही नवे विचार त्या दोघींना दिले.

शास्त्रीय संगीत शिकायला सुरुवात झाल्यावर आकाशवाणीवर ऑडिशन होऊन शास्त्रीय संगीत आणि सुगम संगीत कलाकार म्हणून कीर्तीला आकाशवाणीवर अनेक संधी मिळाल्या. अनेक चेनबुकिंग, दोन वेळा अखिल भारतीय मंगळवासिय संगीत सभेत गाण्याचा मान मिळाला. पूर्वी बुधवारी सकाळी प्रत्यक्ष प्रसारणासाठी सकाळचा राग गावा लागत असे, एकदा पतंजली मादुसकरांनी त्या कार्यक्रमासाठी बोलवला असता कीर्तीनी त्यावेळी बुवांनी शिकवलेली रत्नाकर रामनाथकरांनी 'देसी' रागात बांधलेली, रुपक तालातली चीज त्याने गायली होती. शास्त्रीय संगीताबरोबरच अभ्यंकर बुवांनी कीर्तीला काही हिंदी, गुजराथी, रचना, भजने, भावगीते शिकवली होती.

त्रिवेंद्रमच्या सहलीत थोर शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव यांनी त्यांच्या घरी 'शंकराभरणम्' चित्रपट पाहण्याचा आग्रह धरण्याने तो चित्रपट किर्तीने पाहिला. त्यातील 'शंकरा भरणम्' गाण्यानं तीला वेड केलं होतं. त्या गाण्याची प्रॅक्टीस करुन तीने ते नगरच्या एका मैफलीत बेधडक गाऊन पाहिले. त्याला फार छान दाद मिळाली. ललीत कलादर्शनच्या अमृत महोत्सवाचा सोहळा हुबळीला झाला होता. पुण्या मुंबईतील सारे कलाकार त्यात सहभागी झाले होते; त्या कार्यक्रमात कीर्तीने आवर्जून 'शंकराभरणम्' गायले. त्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. त्या सोहळ्यात 'शंकरा भरणम्' ने खास छाप उमटवला. वन्समोअरचा गडगडाट, थोर लेखक रणजित देसाईंनी उभं राहून पुन्हा गाण्याची केलेली विनंती 'पुन्हा शंकराभरणम्' आणि 'टाळ्यांचा कडकडाट' या प्रसंगाचा तो क्षण कीर्तीला अजूनही मोरपिसारासारखा वाटतो.

केवळ गंभीर, करुण आणि शृंगार रसावर आधारीत पदांनाच लोकप्रियता लाभते असा समज असतो. चंचल गाण्यांनाही छान दाद मिळू शकते हे कीर्तीला 'रेवती'च्या हृदयी धरा हा बोध खरा' या पदांमुळे कळलं. 'रेवती' अल्लड आणि थट्टेखोर आहे या वाक्याचं 'इम्प्रोवायझेशन तीने हृदयी धरा' या पदात करुन पाहिलं त्यात तिच्या नकल्या स्वभावाची मदत मिळाली. भजन प्रकाराची सुरुवात कीर्तीने 'हृदयी धरा' इतकंच म्हणून शृंगारिक ठुमरीच्या आविर्भावात केली. 'आश्विन शेट'ला खुलवून शेवटी थंड पाणी ओतल्यासारखं हा बोध खरा असं भजन सुरु केलं. रेवतीचा सगळा खट्याळपणा त्या पदात खळखळत राहिला. गाण्यातून अश्विन शेटची उडवलेली टर प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली. कोल्हापूरच्या एका आजींनी आपल्या हातातली सोन्याची बांगडी त्या अदाकारीसाठी कीर्तीला बक्षिस दिली.

'कान्होपात्रा' नाटकातल्या कान्होपात्राच्या भूमिकेनं कीर्तीला परमेश्वर सान्निध्याचा आध्यात्मिक अनुभव मिळाला. मा. कृष्णरावांचं सुंदर संगीत, कान्होपात्रेच्या उत्कट काव्यरचना... तिचा जीवन संघर्ष आणि परमेश्वर चरणावर तिचा होणारा देहांत. ही विलक्षण वेगळी गोष्ट होती. इथं टाळ वाजवून भजन म्हणण्याची कीर्तीला हस्तगत झालेली कला उपयुक्त ठरली. ■

## तोरे जमीं पर

अनिता पाध्ये



# आता कशाला उद्याची बात – शांता हुबळीकर

'आता कशाला उद्याची बात?' हे लोकप्रिय गीत ज्या मराठी अभिनेत्रीने आपल्या सुमधुर ते गायलं होतं आणि जिच्यावर ते चित्रित झालं होतं; ती अभिनेत्री म्हणजे शांता हुबळीकर. मराठी सिनेसृष्टीचा सुरुवातीचा काळ या अभिनेत्रीने आपल्या अभिनयाने व गायनाने गाजवला. अभिनयसंपन्नता, उंच, शेलाटा बांधा, सुंदर चेहरा आणि गाता गळा हे गुण शांताबाईंच्या व्यक्तीमत्त्वात सामावलेले होते. या आपल्या गुणांवर लोकप्रियता, यश, पैसा, प्रसिद्धी मिळवलेल्या शांताबाईंच्या आयुष्याची नंतरच्या काळात फार फरफट झाली.

शांताबाईंचं आयुष्य, जीवनातील घटना एखाद्या चित्रपटाची कथा-पटकथा शोभावी अशाच आहेत. कर्नाटकातील हुबळीजवळच्या अदरगुंची या गावातील एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. शांताबाईचं मूळ नाव राजम्मा. त्या तीन वर्षाच्या असताना त्यांच्या आई-वडिलांचं एका पाठोपाठ निधन झालं. त्यांच्या मोठ्या बहिणीचं-नीलम्माचं लग्न झालं होतं तर धाकटी बहीण शारदा फक्त अकरा दिवसांची होती. त्यामुळे या दोन पोरक्या मुली आईच्या आईकडे म्हणजे आजीकडे वाढू लागल्या. तीन-चार वर्ष बऱ्यापैकी सरली; परंतु एका वर्षी मोठा दुष्काळ पडला, ज्यामुळे नातींना पोटभर खाऊपिऊ घालणं आजीला अशक्य होऊ लागल्याने तिने दोन्ही नातींना हुबळीला आपल्या विधवा शेतमालकिणीकडे - सावित्राक्काकडे-पाठविलं.

चंद्राक्का या दत्तक मुलीसह सावित्राक्का हुबळीला आपल्या चिरेबंदी वाड्यात राहत असे. तिने राजम्माचे नाव बदलून शांता असं केलं आणि दोन्ही मुलींना प्रेमाने वाढवू लागली. सावित्राक्काकडे शांताबाईंना शालेय शिक्षणाबरोबरच पाककला, तसंच अब्दुल करीमखाँ साहेबांकडून चार वर्षे शास्त्रीय संगीताचं शिक्षण घेण्याची संधी मिळाली. परंतु बरेच प्रयत्न करुन देखील शिक्षण, पाककला व संगीतकलेत तरबेज असलेल्या शांताबाई काळ्यासावळ्या व अनाथ असल्याने त्यांचं कुठेही लग्न जमेना. त्यामुळे चंद्राक्काने एका पंच्याहत्तर वर्षांच्या वृद्धाशी शांताबाईंचं लग्न ठरवलं. ही गोष्ट कळताच एका रात्री शांताबाईंनी आपल्या मैत्रिणीच्या नवऱ्याच्या मदतीने घरा-तून पळ काढला. त्याच माणसाच्या ओळखीमुळे शांताबाईंना 'गुब्बी' या नाटक कंपनीमध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे त्यांच्या जेवणाचा-राहण्याचा व पैशांचा प्रश्न सुटला होता. ही घटना आहे १९३० मधली.

हळुहळु शांताबाईंना नाटकांमध्ये महत्त्वाच्या भूमिका मिळू लागल्या. १९३५ साली या नाट्य कंपनीचा मुक्काम बेळगावच्या हुबळीमध्ये असताना एक दिवस शांताबाईंचा आवाज पेटीवादक वासुदेवराव शिंदेच्या कानी पडला आणि त्यांनी कोल्हापूर सिनेटोनच्या बाबूराव पेंढारकरांकडे शांताबाईंची शिफारस केली.





आणि मग सुरु झाला शांताबाईंचा चित्रपट प्रवास... दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांच्या हाताखाली त्यांनी अभिनयाचे धडे घेतले. अभिनय शिक्षणाबरोबरच भालजींच्या साध्या राहणीचा व वक्तशीरपणाचा शांताबाईंनी अंगीकार केला. भालजींच्या 'कान्होपात्रा' या चित्रपटात त्यांनी कान्होपात्रेच्या आईची भूमिका साकार केली.

१९३७ मध्ये 'प्रभात फिल्म कंपनी' मध्ये रुजू होत त्यांनी 'माझा मुलगा' व 'माणूस' या दोन चित्रपटांमध्ये महत्वाच्या व्यक्तीरेखा साकारल्या. व्ही. शांताराम दिग्दर्शित 'माणूस' व त्याचाच हिंदी रिमेक असलेल्या 'आदमी' या सिनेमाने शांताबाईंना नावलौकिक पैसा व लोकप्रियता मिळवून दिली. 'आदमी' हा चित्रपट केवळ भारतभरातच नाही तर परदेशातही खुप गाजला. विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिनने देखील या चित्रपटाची प्रशंसा केली होती. 'माणूस' मधील शांताबाईंनी गायलेली सर्वच गाणी खुप लोकप्रिय ठरली. त्यांनी गायिलेलं 'आता कशाला उद्याची बात' हे त्यांचं गाणं तर अजरामर गीत म्हणुन गणलं जातं.

'माणुस' मुळे शांताबाईंना खुप नाव, प्रसिद्धी, वलय, लोकप्रियता मिळाली खरी. परंतु काही काळातच व्ही. शांताराम यांच्याशी वैचारिक मतभेद झाल्याकारणाने त्यांना 'प्रभात फिल्म कंपनी' सोडावी लागली. वर्षभरातच पुण्याच्या 'डेक्कन एम्पोरियम' चे मालक बापूसाहेब गीते यांच्याशी शांताबाईंचा परिचय झाला. गीते विवाहित तर होतेच परंतु शांताबाईंपेक्षा वयाने बरेच मोठे देखील होते. तरीही या गोष्टींना फारसं महत्व न देता शांताबाईंनी बापूसाहेब गीतेंशी विवाह केला.

सुरुवातीचे काही महिने गुण्यागोविंदाने सरले खरे परंतु हळुहळु शांताबाईंच्या लक्षात आलं की, बापुसाहेब गीते आपल्या व्यवसायाकडे फारसं लक्ष देत नाहीत. शिवाय त्यांच्या डोक्यावर कर्जाचा बराच मोठा डोंगर आहे. त्यामुळे मानसिकरित्या शांताबाई निराश झाल्या. त्यातच भर पडली ती मुलाच्या वियोगाची. त्यांचा पहिलाच मुलगा जन्मल्यानंतर अवघ्या चार महिन्यातच निधन पावला. मात्र हे दु:ख बाजुला सारुन शांताबाई चित्रपटांच्या शुटिंगमध्ये सहभागी झाल्या. 'प्रभात', 'जीवननाटक', 'मालन', 'घर संसार' व विश्राम बेडेकर दिग्दर्शित 'पाळणा' अशा अनेक चित्रपटांत त्यांनी उत्तम व्यक्तीरेखा साकारल्या. कानडी मातभाषा असुनही 'घरसंसार' या एकाच कानडी चित्रपटामध्ये त्यांनी काम केलं होतं.

दिग्दर्शक विश्राम बेडेकर यांच्यासह काम करतानाच त्यांचा एक किस्सा सांगते. चित्रपटातला एक गंभीर प्रसंग चित्रित होणार होता. चित्रिकरणाची तयारी सुरु होती म्हणून कलाकार सेटवरच गपा मारत बसले होते. अचानक विश्राम बेडेकरांचं शांताबाईंकडे लक्ष गेलं तर साडीच्या ओचात ठेवलेल्या जिलेब्या खात शांताबाई अन्य कलाकारांसह जोरजोराने हास्य विनोद करत होत्या. हे बघताच बेडेकर मनोमन शांताबाईंवर चांगलेच चिडले. काय बाई आहे ही, आता एक गंभीर प्रसंग चित्रित करायचाय हे माहिती असूनही ही बाई हसतेय? जिलेब्या खातेय? बेडेकरांच्या मनात हा प्रश्न आला. ■

(पूर्वार्ध)

## सहज सुचलं म्हणून...

विलास समेळ



# साडी

दुपारची वामकुक्षी काढून फ्रेश झालो नि हॉलमध्ये येऊन सोफ्यावर बसलो. सकाळी महाराष्ट्र टाईम्सचा अर्धवट राहिलेला अग्रलेख वाचताना चहाची वाट पाहत बसलो होतो. किचनमध्ये गॅस चालू होता नि बेडरुममध्ये मॅडमची कसली तरी तयारी. पाचच मिनिटात हातात दोन चहाचे मग घेऊन आलीच ती. छान साडी नेसलेली पाहून मी बघतच बसलो. तिने टिपॉयवर मग ठेवले. मी म्हटलं, छान दिसतेस या साडीत ! खरं तर तू , ते गाऊन नि ड्रेस घालतेस ना, ते मला अजिबात आवडत नाहीत. एकीकडे चहा घेताना माझं मत व्यक्त केलं. पण त्यामुळे काय झालं माहित आहे का?

नेमका तोच धागा पकडत सौ. म्हणाली, चहा झाला की, उठा नि तयार व्हा. आपल्याला बाहेर जायचंय. मला काहीच अर्थबोध होईना. नेहमीप्रमाणे मी तयार झालो आणि आम्ही बाहेर पडलो. सोसायटीच्या बाहेर येताच सौ. ने एक रिक्षा थांबवली नि ड्रायव्हरला म्हणाली, चलो वैशाली....मला समजलं नाही तरी पुन्हा नेहमीप्रमाणे गप्प बसलो. पंधरा वीस मिनिटांनी रिक्षा थांबली. त्याचे पैसे दिले नि समोर नजर टाकली. तर समोरच 'वैशाली साडी सेंटर' चा बोर्ड आणि त्याखाली लावलेलं सेल... सेल... सेलचं आमिष!

सौ. च्या पाठोपाठ जाताना तिनं म्हटलं, तुम्ही नेहमी म्हणता ना की, मी साडीतच छान दिसते वगैरे... ते गाऊन नि ड्रेस मला शोभत नाहीत. म्हणून म्हटलं तीन चार साड्या घेऊनच टाकाव्या. अनायासे सेल सद्धा लागलाय. कसं? मी मनातल्या मनात कपाळावर हात मारुन घेतला! 'मेरी बिल्ली मुझसेही म्याव'... करत होती, दुकानात शिरलो. एक तासाच्या उलटापालटी नंतर चार साड्या त्याला मॅचिंग परकर नि ब्लाऊजपीस घेऊन सात आठ हजार गुगल पे करुन परतलो एकदाचा. त्या दिवशी मनाशी एक




खूणगाठ बांधली. अगदी पैठणी नेसून ही समोर आली तरी छान, मस्त दिसतेस असं चुकून सुद्धा बोलायचं नाही. फारच मनापासून आवडलं तर मनातल्या मनातच बोलायचं. यावरुन संबंधितांनी थोडा जरी बोध घेतला तर माझ्या लेखाचं नि अनुभवाचं सार्थक होईल. ■

८८७९००५८५८

**काही अपरिहार्य कारणामुळे दर शनिवारी प्रसिद्ध होणारे 'बालांगण', 'ग्लॅम वर्ल्ड' पान आजच्या अंकात प्रकाशित करण्यात आलेले नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**- मुख्य संपादक**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)